जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# जमीन खरेदी व्यवहारात ५० लाखांची फसवणूक; गुन्हा दाखल

नगर – जमीन खरेदी करून देतो असे सांगून एकाकडून ५० लाखांची रक्कम घेवून नंतर जमिनीची खरेदी करून देण्यास टाळाटाळ करत आर्थिक फसवणूक केल्याचा प्रकार २२ नोव्हेंबर २०१६ ते २७ नोव्हेंबर २०२२ या कालावधीत नगर तालुक्यातील शेंडी तसेच नगर शहरातील दिल्लीगेट परिसरात घडली आहे. या प्रकरणी चौघांच्या विरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात ६ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत हसन अमीर राजे (रा. पारनेर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हसन राजे यांची शेंडी येथील नसीर साहेबलाल शेख, नजीर साहेबलाल शेख, श्रीमती अबिदा अब्बास सय्यद, एकनाथ दगडू भगत यांच्याशी जमीन खरेदी व्यवहाराबाबत चर्चा झाली होती. या चौघांनी फिर्यादी यांना जमिनीची खरेदी करून देण्याबाबत त्यांचा विश्वास संपादन करून त्यांच्या कडून सुमारे ५० लाखांची रक्कम घेतली. नंतर जमिनीची खरेदी देण्यास टाळाटाळ केली. तसेच त्यांना पैसेही परत दिले नाहीत. आपली फसवणूक झाल्याचे फिर्यादी यांच्या निदर्शनास आल्यावर त्यांनी याबाबत न्यायालयात दाद मागितली. न्यायालयाने गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिल्यानंतर ६ ऑक्टोबर रोजी हसन राजे यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. या फिर्यादी वरून पोलिसांनी चौघांच्या विरुद्ध भा.दं. वि. कलम १२० (ब), ४२०, ४०६, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.



महापुरुषांबद्दल आक्षेपार्ह पत्रके भिरकावणाऱ्याला तात्काळ अटक करावी अशा मागणीसाठी सकल आंबेडकरी समाजाच्यावतीने पोलीस अधीक्षकांना निवेदन देण्यात आले.

# नगरमध्ये महापुरुषांबद्दल आक्षेपार्ह पत्रके भिरकावणाऱ्याला तात्काळ अटक करावी

## सकल आंबेडकरी समाजाची मागणी : पोलीस अधीक्षकांना निवेदन देत घटनेचा तीव्र निषेध

नगर – अहिल्यानगर शहरातील उड्डाणपुलावरून तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याजवळ विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल आक्षेपार्ह पत्रके भिरकावण्यात आली. या पत्रकात आमदार संग्राम जगताप यांच्या नावाचा उल्लेख देखील करण्यात आला आहे. हा प्रकार संतापजनक असून शहरात जातीय तेढ निर्माण करून दंगल घडवण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप समस्त आंबेडकरी समाजाने केला आहे.

या संदर्भात आंबेडकरी समाजाच्यावतीने जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन देण्यात आले. या निवेदनात आरोपीचा शोध घेऊन तात्काळ अटक करून कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच उड्डाणपुल परिसरातील सर्व सीसीटीव्ही फुटेज तपासून आरोपींना शोधण्याची मागणी करण्यात आली आहे.

शहरात जातीय तेढ निर्माण करण्याचा हा प्रयत्न असून पोलिसांनी तातडीने कारवाई न केल्यास समस्त आंबेडकरी समाजाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल.

### न्या.भूषण गवई यांच्यासंदर्भात घडलेल्या प्रकाराचाही निषेध

दरम्यान, देशाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या संदर्भात घडलेल्या निंदनीय प्रकाराचाही तीव्र निषेध आंबेडकरी समाजाने व्यक्त केला असून, संबंधित आरोपींना कठोर शिक्षा करण्यात यावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

या वेळी सुरेश बनसोडे, अशोक गायकवाड, अजय साळवे, सुमेध गायकवाड, किरण दाभाडे, अतुल भिंगारदिवे, सागर ठोकळ, सिद्धार्थ आढाव, सुहास पाटोळे, सचिन शेलार, प्रा. विलास साठे, संदेश लांडगे, अंकुश मोहिते, सुनील शेत्रे, भीमराव पगारे, पप्पू शिंदे, प्रमोद वडागळे, सतीश शिरसाठ, योगेश थोरात, अमित काळे, अतुल ढेपे, समीर भिंगारदिवे, सागर भिंगारदिवे, विशाल गायकवाड, सुभाष वाघमारे, राहुल शिवशरण, अजय पाखरे आदी उपस्थित होते.

# गुरु गोरक्षनाथ मूर्तीची विटंबना; शासनाने कठोर कारवाई करावी

### सकल हिंदू समाजातर्फे निवेदन

नगर – दत्त भक्तांचे आराध्य तीर्थक्षेत्र गिरनार पर्वत येथील गुरुवर्य गोरक्षनाथ यांच्या मूर्तीची अज्ञात समाजकंटकांनी विटंबना करून हिंदू धर्मियांच्या भावनांवरती तीव्र आघात केला आहे. या घटनेचा निषेध करणारे निवेदन निवासी जिल्हाधिकारी दादासाहेब गीते यांना सकल हिंदू समाजातर्फे देण्यात आले.



गिरनार पर्वत येथील गुरुवर्य गोरक्षनाथ यांच्या मूर्तीची विटंबना करणाऱ्यांवर कारवाई करावी, या मागणीचे निवेदन निवासी जिल्हाधिकारी दादासाहेब गीते यांना सकल हिंदू समाजातर्फे देण्यात आले.

याप्रसंगी शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे जिल्हा प्रमुख बापू ठाणगे, गुरु गोरक्षनाथ प्रतिष्ठानचे गोकुळ (नाना) आठरे, मच्छिंद्रनाथ अस्थानाचे दादा जपकर, सर्जेपुरा येथील गोरक्षनाथ ठाण्याचे नाथ भक्त छावा संघटनेचे दत्ता वामन, स्वामी समर्थ केंद्राचे अजिंक्य गायकवाड, दत्त देवस्थानचे संजय जोशी व जिल्हाभरातून आलेले नाथ, दत्त भक्त उपस्थित होते.

याप्रसंगी नाथ भक्तांच्यावतीने ठाणगे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या, ते म्हणाले जुनागड (गुजरात) येथील गुरुदेव दत्तांच्या गिरनार पर्वतावरील परिक्रमा मार्गावर नाथ परंपरेतील गुरुवर्य गोरक्षनाथ यांचे मंदिर आहे. ४ ऑक्टोबर रोजी मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात समाजकंटकांनी ती खंडित करून नाथ संप्रदाय दत्तभक्त परिवार व सकल हिंदूंच्या श्रद्धांवर तीव्र आघात केला आहे. ही मूर्ती अतिशय क्रूरपणे तोडली असून त्यातून या समाजकंटकांचा हिंदू धर्म, मूर्तिपूजा याबाबतचा तीव्र द्वेष दिसत आहे. हिंदू धर्मियांच्या श्रद्धास्थानांवरती आघात करणे, मुर्त्यांची तोडफोड करणे, विविध मिरवणुकांवरती दगडफेक करून दहशत निर्माण करणे, मंदिरांच्या जागा बळकावणे, विविध भडकावणाऱ्या घोषणा फलक जागोजागी प्रदर्शित करणे असे प्रकार वारंवार संपूर्ण देशभर होत आहेत.

हिंदू धर्मीय शांतताप्रिय, पापभिरू व सहिष्णू असून या शांतताप्रिय समाजाला विनाकारण डिवचून संपूर्ण देशात अशांतता पसरवण्याचा हा आंतरराष्ट्रीय कट आहे. प्रशासनाने ही घटना गांभीर्याने घ्यावी व या प्रकरणाची पाळेमूळे खणून असे प्रकार पुन्हा होणार नाहीत यासाठी आवश्यक ती कठोर कारवाई करावी.

या संदर्भात लवकरच जिल्हाभरातील नाथ भक्तांची संयुक्त सभा नगर शहरात आयोजित करण्यात येणार असल्याचीही माहिती त्यांनी दिली. गुरु गोरक्षनाथ प्रतिष्ठानचे आठरे, मच्छिंद्रनाथ अस्थानाचे जपकर, छावा संघटनेचे श्री. वामन यांनीही अशा घटना पुन्हा घडू नये यासाठी प्रशासनाने या समाजकंटकांवर कठोर कारवाई करावी व जरब बसवावी अशा आशयाच्या भावना व्यक्त केल्या.

# एसटी बस प्रवासात ८ लाख ४० हजारांच्या सोन्याच्या दागिन्यांची चोरी; गुन्हा दाखल

नगर – एसटी बसच्या प्रवासात महिलेच्या बॅग मधून ८ लाख ४० हजार रुपये किंमतीच्या सोन्याच्या दागिन्यांची चोरी झाल्याची घटना जुने बस स्थानक ते तारकपूर बस स्थानक या दरम्यान ५ ऑक्टोबर रोजी सकाळी ११.०५ ते ११.२० वाजण्याच्या कालावधीत घडली आहे. बसमध्ये शेजारी सहप्रवासी म्हणून बसलेल्या महिलेने ही चोरी केल्याचा संशय व्यक्त करण्यात आला असून त्या संशयित महिलेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सुहासिनी पंडित आडोळे (वय ४८, रा. पोलीस कॉलनी, नंदनवननगर, बोल्हेगाव) यांनी ६ ऑक्टोबर रोजी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी या त्यांच्या पती समवेत ५ ऑक्टोबर रोजी सकाळी सोलापूर येथून नगरकडे एसटी बस ने येत होत्या. त्यांना तारकपूर बस स्थानक येथे उतरायचे असल्याने त्यांची बस प्रथम जुन्या बसस्थानकात आली. तेथून तारकपूर बसस्थानकात गेल्यावर तेथे उतरून त्या बोल्हेगाव येथे घरी गेल्या. त्यांनी त्यांची बॅग पाहिली असता त्यामध्ये ठेवलेले सुमारे ८ लाख ४० हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने त्यांना दिसून आले नाहीत. दागिने चोरीला गेल्याचे त्यांच्या निदर्शनास आल्यावर त्यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात जावून फिर्याद दिली. या फिर्यादीत त्यांनी त्यांच्या शेजारी सह प्रवासी म्हणून बसलेल्या आंनी तोंडाला स्कार्फ गुंडाळलेल्या एका तरुणीवर संशय व्यक्त केला आहे. त्यांच्या फिर्यादी वरून संशयित अनोळखी तरुणीच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आरएसएस) स्थापनेच्या शताब्दीनिमित्त जारी करण्यात आलेल्या शंभर रुपयांच्या नाण्यावर ‘बहिष्कार’

## संविधानाचा अवमान उपस्थित करुन संविधाननिष्ठ आंदोलनाची घोषणा, धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वावर मोठे प्रश्नचिन्ह : ॲड. कारभारी गवळी



नगर – राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या (आरएसएस) स्थापनेच्या शताब्दी निमित्ताने जारी करण्यात आलेल्या १०० रुपयांच्या नाण्यावर पीपल्स हेल्पलाईनच्या वतीने बहिष्काराची हाक देण्यात आली आहे. भारताचे प्रजासत्ताक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही या चार अविचल स्तंभांवर उभे आहे. हे मूल्य केवळ घोषवाक्य नसून, स्वातंत्र्यसैनिकांच्या बलिदानातून आणि संविधान निर्मात्यांच्या दृष्टीतून साकारलेले असल्याचे स्पष्ट करुन, सदर नाणे या धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वावर मोठे प्रश्नचिन्ह उभे करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या निर्णयाविरोधात सर्वभारतीय धर्मनिरपेक्ष बहिष्कार जाहीर करण्यात आला असल्याची माहिती ॲड. कारभारी गवळी यांनी दिली.

स्मारक नाणे हे केवळ आर्थिक व्यवहाराचे माध्यम नसते; ते शासनाच्या विचारसरणीचा, दृष्टिकोनाचा आणि राष्ट्रीय मूल्यांचा प्रतीक असते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, नेताजी सुभाषचंद्र भोस, भगतसिंग यांसारख्या सर्वसमावेशक आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्वांच्या स्मरणार्थ जारी करण्यात आलेली नाणी देशातील एकात्मता आणि समता दर्शवतात. मात्र, विशिष्ट विचारसरणीशी निगडित आणि धार्मिक ध्रुवीकरणाशी अनेकदा जोडल्या गेलेल्या संस्थेच्या शताब्दी निमित्ताने स्मारक नाणे जारी करणे हे, राज्य आणि धर्माच्या विभक्ततेच्या संविधानिक तत्त्वाला छेद देणारे असल्याची टीका संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

धर्मनिरपेक्षता म्हणजे कोणत्याही धर्माचा विरोध नव्हे, तर सर्व धर्मांचा समान आदर राखत राज्याची तटस्थता जपणे. हाच भारताच्या सामाजिक एकात्मतेचा पाया आहे. आरएसएसची विचारधारा धार्मिक–सांस्कृतिक ध्रुवीकरणाशी जोडली जाते, असा आरोप अनेक बुद्धिजीवी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे. अशा पार्श्वभूमीवर या संस्थेला सरकारी पातळीवर सन्मान देणे म्हणजे भारताच्या विविधतेतील ऐक्याला तडा देणे, असे मत ॲड. गवळी यांनी व्यक्त केले आहे.

संविधानावर निष्ठा असलेले सर्व विवेकनिष्ठ नागरिक, शिक्षक, पत्रकार, समाजसेवक, शेतकरी आणि विद्यार्थी यांच्या वतीने सर्वभारतीय धर्मनिरपेक्ष बहिष्कार जाहीर करण्यात आला आहे. हा बहिष्कार कोणत्याही संस्थेविरुद्ध नाही, तो संविधानाच्या आत्म्याच्या रक्षणासाठी आहे. हा आंदोलनात्मक निर्णय भारताच्या धर्मनिरपेक्ष ओळखीचे आणि राज्याच्या तटस्थतेचे संरक्षण करण्यासाठी असल्याचे म्हटले आहे.

बहिष्कारकर्त्यांनी सरकारकडे मागणी केली आहे की, हे नाणे तातडीने मागे घेण्यात यावे आणि भविष्यात कोणत्याही एका विचारसरणीला किंवा धार्मिक पार्श्वभूमीला प्रोत्साहन देणाऱ्या प्रतीकांना राष्ट्रीय सन्मान देऊ नये. राष्ट्रीय नाणी, तिकिटे आणि चिन्हे ही एकता, विविधता आणि सर्वसमावेशकतेची प्रतीक असावीत, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

भारत कोणत्याही एका धर्माचा, जातीचा किंवा विचारधारेचा देश नाही. भारत म्हणजे करुणा, विवेक, बंधुता आणि विविधतेतील एकता. आमचा धर्म म्हणजे मानवता, आमचा विचार म्हणजे संविधान, आणि आमचा मार्ग म्हणजे विवेकनिष्ठ भारत! असल्याचे पीपल्स हेल्पलाईनच्या वतीने हाक देण्यात आली आहे.

या बहिष्कारासाठी ॲड. गवळी, ॲड. सुरेश लगड, ॲड. अजिंक्य काळे, ॲड. आनंद सूर्यवंशी, ॲड. देशमुख प्रयत्नशील आहेत.

# सचिन अरुणकाका जगताप आता बनणार ‘मुख्यमंत्री’

नगर – जिल्हा परिषदेचे माजी सदस्य ॲड. सचिन अरुणकाका जगताप हे राजकिय क्षेत्राबरोबरच अभिनय क्षेत्रात भूमिका साकारली आहे. त्यांनी सन टिव्हीवरील लोकप्रिय असलेल्या ‘इन्स्पेक्टर मंजू’ या मालिकेत मुख्यमंत्र्यांची भूमिका साकारली आहे.



ॲड. सचिन अरुणकाका जगताप यांनी आता त्यांनी अभिनय क्षेत्रातही असून सन टिव्हीवरील लोकप्रिय असलेल्या इन्स्पेक्टर मंजू या मालिकेत मुख्यमंत्र्यांची भूमिका त्यांनी साकारली आहे.

ही मालिका सन मराठीवरील लोकप्रिय मालिका म्हणून प्रचलित आहे. वाघोबा प्रॉडक्शन्स ही निर्मिती आहे. निर्माता तेजपाल वाघ, सरोज वाघ हे या मालिकेचे निर्माते आहेत. मोनिका राठी, वैभव कदम, विद्या सावळे, अजय तापकिरे या कलाकारांनी आपल्या अभिनयाद्वारे या मालिकेला वेगळी उंची गाठून दिली आहे. आता या मालिकेत अहिल्यानगर येथील सचिन जगताप हेही अभिनय साकारणार असून मुख्यमंत्र्याची भूमिका ते साकारणार आहेत.

ही मालिका सन मराठीवर रात्री ८ वाजता प्रसारित होते. ७ ते १० ऑक्टोबर व तेथून पुढील एपिसोडमध्ये सचिन जगताप हे मालिकेमध्ये दिसणार आहेत.

सचिन जगताप यांनी मास कम्युनिकेशनचे शिक्षण पूर्ण केले असून अरुणोदय ए.जे. प्रॉडक्शनच्या माध्यमातून ते चित्रपट निर्मिती क्षेत्रात आहेत. नगर हे चित्रपट निर्मितीचे हब करण्याचा त्यांचा मानस आहे. सचिन हे आमदार संग्राम जगताप यांचे मोठे बंधू आहेत.

## नारायण मेरगू यांचे अल्प आजाराने निधन



नगर – कुंभार गल्ली येथील रहिवासी नारायणराव चंद्रय्या मेरगू (वय ६६) यांचे ६ ऑक्टोबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर ७ ऑक्टोबर रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, हरीष व राहुल ही २ मुले, १ मुलगी, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे.

## कुसुमबाई शेटे यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर – अहिल्यानगर येथील रहिवासी कुसुमबाई भिमाशंकर शेटे (वय ९५) यांचे २ ऑक्टोबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर ३ ऑक्टोबर रोजी नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या मागे ४ मुले, १ मुलगी, पुतणे, सुना, नातवंडे असा परिवार आहे. आडते बाजार येथील हॉटेल वृंदावनचे संचालक सुभाष, सतिश, सुहास, संजय शेटे यांच्या त्या मातोश्री होत.



मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# शासकीय रुग्णालयांमध्ये सुविधा नाहीत अन् खासगी रुग्णालयांमध्ये होत आहे पिळवणूक

### आर्थिक पिळवणुकीवर लगाम लावण्यासाठी आंतरराष्ट्रीय मानवाधिकार संघाचा पुढाकार

नगर – आंतरराष्ट्रीय मानवाधिकार संघाची जिल्हा कार्यकारिणीची बैठक बोल्हेगाव येथील संस्थेच्या कार्यालयात पार पडली. सर्वसामान्य नागरिकांना आरोग्य सुविधा सहज उपलब्ध व्हाव्यात, तसेच खासगी रुग्णालयांमध्ये होणारी रुग्णांची आर्थिक पिळवणूक थांबवण्यासाठी उपाययोजना करण्याच्या उद्देशाने ही बैठक घेण्यात आली. या बैठकीस राज्याध्यक्ष रविराज साबळे, राज्य उपाध्यक्ष शरद शेट्टी आणि पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष संदीप (नाना) कापडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. जिल्हाध्यक्ष पंकज लोखंडे यांनी या बैठकीचे नियोजन केले होते. बैठकीदरम्यान शासकीय रुग्णालयांमधील अपुऱ्या सोयी–सुविधांचा मुद्दा गंभीरपणे उपस्थित करण्यात आला. रुग्णांना योग्य उपचार मिळण्यात होणाऱ्या अडचणींबाबत संघाच्या पदाधिकाऱ्यांनी चिंता व्यक्त केली. तसेच, खासगी रुग्णालयांमध्ये रुग्णांकडून जादा शुल्क वसूल केले जात असल्याबाबत चर्चा होऊन, अशा घटनांवर कारवाईसाठी प्रशासनाकडे तक्रार दाखल करण्याचा निर्णय घेण्यात आला. संघाने ठरविले की, शासकीय हॉस्पिटलमधील सुविधा सुधारण्यासाठी आरोग्य विभागाशी सतत पाठपुरावा करण्यात येईल.



आंतरराष्ट्रीय मानवाधिकार संघाची जिल्हा कार्यकारिणीची बैठक बोल्हेगाव येथील संस्थेच्या कार्यालयात पार पडली.

पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष संदीप कापडे म्हणाले की, मानवाधिकार ही केवळ कायदेशीर संकल्पना नसून ती प्रत्येक माणसाचा श्वास आहे. आज सामान्य नागरिकाला आरोग्य, शिक्षण, रोजगार आणि न्याय या मूलभूत गरजा सहज मिळाल्या पाहिजेत. शासकीय रुग्णालयांमध्ये सुविधा उपलब्ध नाहीत आणि खासगी रुग्णालयांमध्ये रुग्णांची उघडपणे पिळवणूक होते, ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. यासाठी मानवाधिकार संघ म्हणून प्रत्येक पीडित नागरिकाच्या पाठीशी उभे राहण्याचे काम केले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्हा उपाध्यक्ष दीपक कांबळे यांनी सुशिक्षित बेरोजगार युवक–युवतींना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी मार्गदर्शन केले.

कार्याध्यक्ष अनिल गायकवाड, सचिव शरद महापुरे व हबीब शेख यांनी एमआयडीसी क्षेत्रातील विविध कंपन्यांमधील नवीन भरती प्रक्रियेवर चर्चा केली.

शहराध्यक्ष सविता हराळ यांनी महिलांवरील वाढते अत्याचार रोखण्यासाठी आंतरराष्ट्रीय मानवाधिकार संघाच्या माध्यमातून महिलांना न्याय आणि संरक्षण मिळवून देण्याचा संकल्प व्यक्त केला.

उपाध्यक्ष ज्योती वाघ यांनी महिलांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि कौटुंबिक समस्यांबाबत सविस्तर चर्चा केली.

जिल्हाध्यक्ष पंकज लोखंडे यांनी सांगितले की, तालुकास्तरावर बैठकींचे आयोजन करून स्थानिक स्तरावरील प्रश्न तत्काळ सोडवण्या संदर्भात नियोजन केले जाणार असल्याचे स्पष्ट केले.

कार्याध्यक्ष अनिल गायकवाड व संतोष वाघ यांनी स्वागत केले. दीपक कांबळे यांनी आभार मानले.

# गृहिणी

## आरोग्य

### शाकाहार घेण्याचे फायदे

भरपूर ताजे, निरोगी, वनस्पती-आधारित अन्न खाल्ल्याने शरीराला आवश्यक पोषक तत्वे मिळतात. शाकाहार खाल्ल्याने आरोग्यदायी फायदे मिळतात. मांसाहार घेण्यापेक्षा शाकाहारी असणे जास्त चांगले आहे. आरोग्यासाठी शाकाहारी असणे किती महत्त्वाचे आहे आणि त्याचे फायदे काय आहेत, चला जाणून घेऊया. शाकाहारी आहार घेतल्याने मांसाहारी आहाराच्या तुलनेत शरीरात जास्त चरबी जमा होण्याची शक्यता कमी होते. असे म्हटले जाते की जास्त चरबीमुळे रक्तवाहिन्यांमध्ये अडथळा निर्माण होतो. म्हणूनच, जे शाकाहारी आहाराचे पालन करतात त्यांचे हृदय निरोगी मानले जाते. शाकाहारी आहार घेतल्याने वजन वाढण्याचा धोका कमी होतो. शाकाहारी अन्नामध्ये भरपूर आहारातील फायबर असते, जे कर्करोगासारख्या प्राणघातक आजारांपासून बचाव म्हणून काम करते. शाकाहारी आहारा मुळे रक्तदाब नियंत्रित होण्यास मदत होते. उच्च रक्तदाब ही एक सामान्य समस्या आहे. अनेक अभ्यासातून असे दिसून आले आहे की मांसाहारी लोकांमध्ये शाकाहारी लोकांपेक्षा उच्च रक्तदाब होण्याची शक्यता जास्त असते.

## पाककला

### मसाला मिर्च-मकई

**साहित्य :** एक मोठं मक्याचं कणीस (मधुमका/ स्वीट कॉर्न), २ मोठ्या शिमला मिरच्या (साधारणपणे २५० ग्रॅम), २ मध्यम टोमॅटो, २ मध्यम कांदे, ४/६ लसणीच्या पाकळ्या, धणेपूड + जिरेपूड + हळद + लाल तिखट मिळून १ ते १.५ टेबलस्पून, मीठ, चवीला जराशी साखर, फोडणीकरता तेल आणि जिरं

**कृती :** सगळ्या भाज्या बारीक चिरून घ्याव्यात. सिमला जरा मध्यम आकारात चिरावी. तेलाची फोडणी करून जिरं फुलवावं आणि त्यात लसूण - कांदा जरा सोनसळू द्यावा; तो तसा झाला की मगच टोमॅटो घालून मसाल्याला तेल सुटेपर्यंत परतावं. यात आता कोरडे मसाले घालून मिनिटभर होऊ द्यावं. त्याचा कचवट वास निवला की मक्याचे दाणे घालावे आणि जरा परतावे. मसाला दाण्यांना नीट माखला की यात पाव वाटी पाणी घालून वर झाकण घालावं आणि मक्याचे दाणे जरा शिजू द्यावे; लागेल तसे पाणी घालावे पण नंतर अजिबात पाणी राहाता कामा नये. मका ऑलमोस्ट शिजला की यात चिरलेली मिरची, मीठ आणि अगदी हवीच असेल तरच चिमटीभर गरजेप्रमाणे साखर घालावी. सगळं नीट हलवून झाकण घालून भाजी पूर्ण शिजवून घ्यावी. शेवटी जरा मोठ्या आचेवर ठेवून खरपूस करावी सारखी परतत राहून गरमागरम भाजी फुलक्यांसोबत सुरेख लागते.

## वास्तू

### संतती सुखासाठी

जर एखाद्या स्त्रीला संततीचे सुख हवे असेल तर बेडरूममध्ये कृष्णाच्या बालस्वरुपाचे चित्र लावणे चांगले मानले जाते. जर तुम्ही कृष्णाजींच्या बालस्वरूपाचे चित्र लावत असाल तर ते पूर्व आणि पश्चिम दोन्ही भिंतींवर लावता येईल. तथापि, आपले पाय कधीही त्यांच्या बाजूला नाहीत याची खात्री करा.

## सौंदर्य

मेथी दाणे हे प्रथिने, लोह, कॅल्शियम, व्हिटॅमिन्स आणि ॲंटिऑक्सिडंट्सचे उत्कृष्ट स्रोत आहेत. हे घटक केसांच्या मुळांपर्यंत पोहोचून त्यांना आतून बळकट करतात.

## सल्ला

कपडे धुताना व्हिनेगर आणि पाण्याचे मिश्रण वापरल्यास इस्त्री न करताही सुरकुत्या कमी होतात.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

**बुधवार, दि. ८ ऑक्टोबर २०२५**

**---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, आश्विन कृष्णपक्ष, अश्विनी २२।४५, सूर्योदय ०६ वा. ३३ मि. सूर्यास्त ०५ वा. ३४ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** चांगले भोजन मिळेल. मौजमजेत दिवस व्यतीत होईल. एखाद्या महत्वाच्या व्यक्तीशी भेट झाल्याने आनंद होईल.

**वृषभ :** खाद्या महत्त्वाच्या व्यक्तीची भेट आपल्यासाठी आनंदाची ठरेल. धार्मिक कार्यांमध्ये खर्च होण्याची शक्यता आहे.

**मिथुन :** कला क्षेत्रात यश मिळण्याची शक्यता आहे. आपणास नवे वाहन मिळण्याची शक्यता आहे. मानसन्मानात वाढ होईल.

**कर्क :** एखाद्या जीवलगाबरोबर भागीदारीसाठी वैयक्तिक पातळीवर संबंध वाढविण्याचा प्रयत्न कराल. यशस्वी व्हाल.

**सिंह :** आपल्या जुन्या लोकांबरोबर किंवा आधार देणाऱ्या मित्रांना जोडणे या वेळी आपल्यासाठी फलदायी ठरेल. मागील उधारी वसुल होईल.

**कन्या :** कौटुंबिक विषयांमध्ये पैसा खर्च होईल. व्यापार-व्यवसायात स्थिती संमिश्र राहील.

**तूळ :** इतर लोकांना आपल्या स्वतःच्या आवश्यकता व इच्छा सांगण्यासाठी ही उत्तम वेळ आहे.

**वृश्चिक :** आजचा दिवस कालच्या दिवसापेक्षा चांगला नसेल. आरोग्याची काळजी घ्या. व्यस्त राहाल.

**धनु :** मानसिक स्थिती आल्हाददायक राहील व वरिष्ठांबरोबर संपर्कात आल्याने प्रसन्न वातावरण राहील. संततीसौख्य लाभेल.

**मकर :** आपला जोडीदार आपणास भावनात्मक पाठबळ देईल. मित्रांमध्ये होणारे वाद आपल्या संबंधासाठी वाईट ठरतील.


**कुंभ :** आर्थिक विषयांमध्ये आपले प्रयत्न आपणास यश मिळण्याचे कारण ठरतील. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून समर्थन मिळेल. अकारण चिंता सतावतील.

**मीन :** आज आपणास कठोर श्रम करावे लागतील. काही निष्कारण चिंतांमुळे आपली व्यग्रता वाढेल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७२७९

सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) एक म्हण - सर सलामत तो +++ +++ ६) तापलेल्या दुधावर येणारा पापुद्रा ७) साखरेच्या पाकात घोळलेले तीळ; एक प्रकारची मिठाई १०) अरण्यातील वास्तव्य; जंगलातील अधिवास ११) पिलू; लेकरू; पाडस १३) मुस्लिमांचे एक प्रार्थनास्थळ १४) समुद्रात लागलेला अग्नी १७) झाडावर पिकलेले फळ १८) त्वचेवरील काळा डाग; तीळ; चामखीळ १९) टोकदार; नोकदार २१) जेवताना पातळ कालवण ज्यात वाढून घेतात ते छोटे पात्र २२) चारित्र्य; वर्तणूक; चाल २३) लीन; रममाण; गुंग; मग्न

**उभे शब्द :-** १) एका हाताची ओंजळ २) दुर्लक्ष; क्षमा ३) झाडाचे पान ४) सहन करणारा; सोशीक ५) सुगंध; सौरभ ८) भांडण सोडविणारे त्रयस्थ मंडळ ९) संत एकनाथांचा प्रबोधनाचा एक भक्तिकाव्य प्रकार १०) ओकारी; उलटी; वांती १२) उसंत; फुरसत १५) काशीचे दुसरे नाव १६) सर्कशीतील विविध शारीरिक प्रयोग; व्यायाम १७) एक पक्षी; जंगली कबूतर १८) उंटाच्या पाठीवरचा उंचवटा; भिस्त २०) वंश; कूळ

### शब्दगंध क्र. ७२७८ चे उत्तर



# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलन :
ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** क्रोधाला लगाम घालण्यासाठी मौना सारखा दुसरा मार्ग नाही.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### वाढदिवसाच्या दिवशी केक का कापला जातो आणि याची सुरुवात कधीपासून झाली?

ब्रिटिशांनी त्यांच्या बरोबर आणलेल्या अनेक प्रथांपैकी ही एक प्रथा आहे. आणि आपल्या सुशिक्षित वर्गाच्या अनुकरण प्रीयते मुळे आपण ती जवळपास पूर्णपणे स्वीकारून टाकलेली आहे.

आपल्या भारतीय प्रथेप्रमाणे वाढदिवशी औक्षण करून मुलाचे वा मुलीचे त्यांना ओवाळून, डोक्यावर अक्षता टाकून, आशीर्वाद देऊन, शुभचिंतन करण्याची प्रथा आहे.

हल्ली आपण सर्व गोष्टींचा विसर पडल्याने या सर्व प्रथा ही जुनाट व गावंढळ समजून, केक कापणे मेणबत्त्या विझवणे हेच आधुनिकतेचे उत्तम प्रतीक असल्यासारखे पाळायला लागलेलो आहोत आणि आता ही प्रथा इतकी सार्वत्रिक झाली आहे की ती आपली प्रथा नाही हेच मुळी नव्या पिढीला पटणार नाही.

कुठलेही शुभ काम हे केक कापून करण्याची प्रथा पाश्चिमात्य संस्कृतीतून आली असली तरी भारतीय संस्कृतीला जोपासणारे, तिच्यासाठी जीव घेणारे आणि जीव देणारे सुद्धा वाढदिवस, शुभारंभ आणि यश हे केक कापूनच करतात.

ग्रीक लोक चंद्राला आर्टेमिस म्हणतात आणि त्याला शुभ मानतात. त्यामुळे आपले शुभ कार्य आरंभण्यासाठी केक कापून सुरु करतात. केकचा वापर हा जर्मनीत सुरु झाला. केकवर मेणबत्त्या लावून त्याला कापणे म्हणजे शुभ संकेत समजतात. त्याला ' Light of Life ' म्हणतात आणि वाढदिवसाच्या समारंभाला 'Kinderfest' म्हणतात.

आता आपण ठरलो नकलची बंदर. म्हणजे डोळे मिटून अनुकरण करणारे माकड. कुठलीही गोष्ट आपण कां करतो ह्याचा शोध घेण्याची आपली सवय नाही. मग ते केक कापणे असो किंवा अजून काही असो. टीव्ही आणि सिनेमाने केक कापण्याचे स्तोम इतके माजविले कि शहरातच नव्हे तर खेड्यापाड्यात बेकऱ्या झाल्यात आणि अगदी झोपडपट्टीतील लोकसुद्धा आपल्या मुलांचा वाढदिवस केक कापून करतात. एका सिनेमात एक सिन होता ज्यात एक भिकारी भीक मागताना आपला वाढदिवस असून केक मिळावा अशी अशा करतो.

योग्य अयोग्य हे व्यक्तिसापेक्ष आहे. ब्रिटिशांनी भारतीय संस्कृतीत रुजवलेल्या चहा, कॉफी, बिस्कीट, ब्रेड, चॉकलेट तत्सम गोष्टींमध्ये केकने सुद्धा हळुवारपणे स्थान मिळवलं. पूर्वी केक हा चैनीचा पदार्थ होता. कालानुरूप बरेच सांस्कृतिक बदल होत गेले आणि बर्थडे केकने घराघरांत शिरकाव केला. आता वाढदिवस आणि केक हे समीकरण खूपच सामान्य झालंय. आपली पत सांभाळून, सामाजिक भान जपून वाढदिवस साजरा करण्यात काही वावगं नाही. राहिला प्रश्न पश्चिमात्यांचं अंधानुकरण करण्याचा, तर त्यांनी आणलेल्या सर्वच गोष्टी वर्ज्य कराव्या लागतील. चहा सुद्धा शरीराला हानिकारक आहे हे आपण जाणतो तरीही ॲसिडीटीच्या गोळ्या खाऊन चहा पिणारी मंडळी आहेतच की. ताटात ठेवलेले अन्न कापणे योग्य नाही !! आपण पुरणपोळीचे हाताने हळूवार दोन भाग करतो कात्री वा सुरीने कापत नाही हे सदैव लक्षात ठेवले पाहिजे !!

### विश्वासाची किंमत

अनेक वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एकदा एका जंगलात एका माळीला एका एकाकी अस्वलाला भेटला. व ते मित्र बनले आणि एकत्र आनंदाने राहू आगळे. आता दोघांच्या छान गप्पा रंगल्या पण आता माळीला खूप झोप यायला लागली.

माळीने त्याच्याकडे फक्त एकच विनंती केली. तो झोपत असताना त्याच्या चेहऱ्यावरून माश्या दूर ठेवशील. आता माळी शांत झोपला. एक माशी माळीच्या चेहऱ्यावर आली. व अस्वलाची नजर तिच्यावर गेली. अस्वल माशीला हकलवून लावू लागले पण माशी कशी जाईना.

जेव्हा अस्वल माशीला हाकलून लावू शकला नाही, तेव्हा त्याने तिला मारण्यासाठी दगड फेकला, पण तो दगड माळीला लागला व माळी मृत्युमुखी पडला.

त्याने अस्वलावर ठेवलेल्या विश्वासाची त्याला खूप मोठी किमंत मोजावी लागली.

तात्पर्य : मूर्ख मित्रांपेक्षा पेक्षा मित्र नसणे चांगले.

## जीवन का अमृत (भाग १)



संत दर्शनसिंह जी महाराज फ़रमाया करते थे कि जैसे बाहर अंतरिक्ष (Outer space) है, वैसे ही अन्दर की भी दुनिया (Inner space) है और उस दुनिया को हमें खोजना है, उसमें जाना है। उस दुनिया में हम तब जा सकते हैं, जब हमारी अंतर की आँख खुली हो, अंदरूनी कान खुले हों, यहाँ शिव-नेत्र पर हम एकाग्र होते हों।

महापुरुषों ने हमें समझाया है कि इस शरीर में नौ दरवाज़े हैं, जिनसे हमारा ध्यान बाहर की दुनिया में जाता है लेकिन एक दसवां द्वार भी है जिसे शिव-नेत्र कहा गया है, Single या Third Eye कहा गया है, जो बाहर की दुनिया में नहीं खुलता, लेकिन अन्दर की दुनिया में खुलता है, उस तरफ़ हमें ध्यान देना है। जब हम उस तरफ़ ध्यान देंगे, तो हम प्रभु के शब्द के साथ जुड़ सकेंगे और शब्द के साथ जुड़ना प्रभु के साथ जुड़ना है। आगे अर्जनदेव जी महाराज फ़रमा रहे हैं :

**लोक पतिआरै कळू न पाईए ।**

### गुरू और परमात्मा

**साचि लगै ता हउमै जाईऐ ।।**

यदि हमने लोगों को प्रसन्न कर दिया, तो समझो कि हमने कुछ नहीं पाया। यदि हम धन कमाने के चक्कर में लगे रहे, नाम कमाने के चक्कर में लगे रहे और घर-गृहस्थी में लगे रहे, अपने व्यापार में लगे रहे और इस दुनिया का जो भी हम पा सकते हैं, उसको पाने में लगे रहे, तो हम यह न सोचें कि हमने बहुत बड़ी कमाई कर ली है। गुरु अर्जनदेव जी महाराज यही फरमा रहे हैं कि इन चीज़ों को अगर हमने पाया, तो हम जान लें कि हमने कुछ नहीं पाया। हमें क्या पाना है? उस सच को पाना है जो आज भी सच है कल भी सच था और आगे भी सच रहेगा। वह क्या है? वह प्रभु का शब्द है, जिसे नाम कहा गया है, Holy Word कहा गया है, Logos कहा गया है, कलमा कहा गया है, Sonorous Light कहा गया है, Voice of Silence कहा गया है। यदि सचाई के साथ जुड़ेंगे, उस सचाई के साथ लगेंगे, जो प्रभु के साथ जुड़ी है, तभी हम कुछ अपने लिए कमा सकेंगे। नहीं तो हम काम, क्रोध, मोह, लोभ और अहंकार के चक्कर में फंसे रहेंगे। यदि हम सचाई के साथ जुड़ जायेंगे, तो हमारा अहंकार नष्ट हो जाएगा और हम एक नम्रता से भरी हुई जिंदगी जीना शुरू कर देंगे। जब हम पूजा-पाठ करते हैं, तो हमारा मस्तक ख़ुद-ब-ख़ुद क्यों झुक जाता है ? इसलिए कि हम प्रभु को याद करते हैं, उन्हें सच्चा समझते हैं और उनकी शरण में जाना चाहते हैं। यहाँ गुरु अर्जनदेव जी महाराज हमें समझा रहे हैं कि जब हम सच्चाई के साथ जुड़ते हैं, उस नाम के साथ जुड़ते हैं, जो सदा-सदा के लिए था, सदा-सदा के लिए है और सदा-सदा के लिए रहेगा, तो जो हमारी ख़ुदी है, अहंकार है, वह अपने आप नष्ट हो जाता है। जैसे-जैसे हम नाम के साथ जुड़ते जाते हैं, वैसे-वैसे 'मैं' हमारे से हटना शुरू हो जाती है। संत दर्शनसिंह जी महाराज ने इसी भाव को अपने एक शेर में समझाया है, बयान किया है। वे फरमाते हैं :

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

संगठन में ही अनुभवों की लेन-देन होती है और कर्म करने में विश्वास बढ़ता है। संगठन द्वारा खेती के बारे में नवीनता को समझ सकते हैं और संगठन के द्वारा ही हम प्राप्त अनाज का सही मूल्य (दाम) प्राप्त कर सकते हैं। समूह में एक-दूसरे के सहयोगी बन सकते हैं। ध्यान के माध्यम से ही आध्यात्मिक ऊर्जा मिलती है।

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय में हजारों किसान भाई-बहनें प्रत्यक्ष रूप में आध्यात्मिकता को अपनाकर संगठित रूप से चल रहे हैं। समय प्रमाण हर एक को अपने मनोबल को बढ़ाकर उमंग-उत्साह में रहना है। चिड़चिड़ापन नहीं करना है, प्रकृति हमारी सहयोगी बने, समय पर आवश्यक वर्षा हो, खेती में खर्चा कम हो, उत्पादन भी गुणवत्तावाला हो, हमारा एक संगठन हो जिसमें अनुभवों की लेन-देन हो, नवीनता के बारे में जानकारी मिले, उत्पादन को उचित दाम मिले। इसके लिए जरूरत है पहले स्वयं को सशक्त बनाने की। अत: राजयोग की विधि को अपनायें और स्वयं के साथ खेती को भी सशक्त बनायें।

### आज्ञा चक्र

सहज राजयोग के प्रयोग द्वारा प्रकृति के पांचों तत्वों को सहयोगी बनाकर यौगिक खेती/ जैविक खेती में सफलता प्राप्त करने के अनुभव जो अत्यन्त प्रेरणादायक हैं, वे इस शाश्वत यौगिक खेती पुस्तक के दूसरे भाग में 'सफलता के आयाम' नाम से लिखे जा रहे हैं। भारतवर्ष के विभिन्न प्रान्तों में ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय के हजारों राजयोगी किसान भाई बहिनें इस प्रकार की यौगिक खेती द्वारा पौष्टिक एवं स्वादिष्ट अन्न, फल आदि तैयार कर रहे हैं।

इस पुस्तक में किसानों के ऐसे अनेक हृदयस्पर्शी अनुभवों को दर्शाते हुए प्रकृति को अपना सहयोगी बनाने, बीज वा धरती माँ को शक्तिशाली, निरोगी बनाने की भिन्न-भिन्न विधियां बताई गई हैं। आशा है सभी प्रकृति प्रेमी, कृषि वैज्ञानिक तथा कृषक भाई बहिनें इस पुस्तक को ध्यान से पढ़कर योग के प्रयोग करने की यथार्थ विधि को स्वयं भी अपनायेंगे तथा अन्य किसानों को भी इसकी प्रेरणा देकर अपनी-अपनी खेती में १०० प्रतिशत सफलता प्राप्त करके अपने देश को धन-धान्य सम्पन्न बनायेंगे।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

न्यायाधिश : मक्या, तू तिसऱ्या वेळेस कोर्टात आला आहेस !
तुला लाज कशी वाटत नाही ?
मक्या - तू तर रोज येतो कि रताळ्या, तु तर कपात बुडून मरायला पाहिजे

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* जगात प्रथमच मानवाला डुकराच्या हृदयाचे यशस्वी प्रत्यारोपण करणारी व्यक्ती कोण? - डेव्हीड बेनेट

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आरोग्य सखी

### आयुर्वेदीय आहार दृष्टीकोन

एक २०-२१ वर्षांची युवती शारीरिक तपासणीसाठी माझ्याकडे आली होती. तिच्याबरोबर एक मुलगा होता. तो कन्सल्टिंगच्या बाहेर वेटींग रूममध्ये बसलेला होता. दोघेही पाठीला सॅक लावून, आधुनिक पेहराव करून आले होते. ते कॉलेजमधील विद्यार्थी होते. मला वाटले भाऊ-बहीण असतील व ते एकत्र कॉलेजला जात असतील. मी तिला विचारले, तुझे नाव काय? काय त्रास होतो?

त्यावर ती म्हणाली, मॅडम, माझे नाव रिना आहे. मी इथे जवळच असलेल्या इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये शिक्षण घेत आहे. तीन ते चार महिन्यांपासून मासिक पाळी अनियमित आहे, अंगावरून पांढरे जाते. कधीकधी माझे स्तनदेखील दुखतात. मला वाटले, की अभ्यासाच्या ताणाने व अशक्तपणामुळे कधी-कधी मुलींना असा त्रास होतो. अविवाहित मुलींची योनिमार्गे तपासणी करणे शक्यतो टाळत असल्यामुळे वरूनच तपासणी करून गोळ्या औषधे दिली. त्यानंतर तिला सांगितले, या औषधांनी तुला बरे वाटेल. त्रास कमी झाला नाही तर परत तपासणीस ये.

काही दिवसांनंतर ती परत त्या मुलाबरोबर तपासणीसाठी आली. मुलगा कन्सल्टिंग रूमच्या बाहेर बसला. ती मला म्हणाली, मॅडम, मागच्या औषधोपचाराने माझा त्रास कमी झाला नाही. उलट आता पांढरट पाण्याबरोबर पिवळसर स्रावही जातो. तसेच योनिभागी भयंकर वेदना व आग जाणवते.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००

# कोजागिरी पौर्णिमा स्त्रीशक्तीचा आणि कर्तृत्वाचा उत्सव

### सुप्रिया जाधव यांचे प्रतिपादन; प्रयास व नम्रता दादी-नानी ग्रुपचा महिलांसाठी रंगला उत्साही सोहळा; २० विजेत्या महिलांना पैठणी साडीचे बक्षीस


कोजागिरी पौर्णिमेनिमित्त प्रयास व नम्रता दादी-नानी ग्रुपच्यावतीने आयोजित कार्यक्रमात सहभागी महिला.

नगर – कोजागिरी पौर्णिमा ही फक्त सण नाही, तर स्त्रीशक्तीचा आणि कर्तृत्वाचा उत्सव आहे. प्रत्येक महिलेमध्ये एक वेगळी ताकद, एक अद्भूत सर्जनशीलता दडलेली असते. तिने ती ओळखून जोपासावी, वाढवावी आणि आत्मविश्वासाने पुढे जावे. त्यांनी महिलांना स्वत:साठी वेळ देण्याचे, आनंद शोधण्याचे आणि कौशल्य जोपासण्याच आवाहन सुप्रिया जाधव यांनी केले.

कोजागिरी पौर्णिमा म्हणजे आनंद, सौंदर्य आणि चांदण्यासारखी स्त्रीशक्ती! याच भावनेला साजेसा असा खेळ पैठणीचा सन्मान नारीशक्तीचा! हा सोहळा प्रयास व नम्रता दादी-नानी ग्रुपच्या वतीने उत्साहात पार पडला. ग्रुपच्या ३२ व्या वर्धापन दिनानिमित्त हा विशेष उपक्रम सावेडी येथील नगरी व्हिलेज हॉटेल येथे घेण्यात आला होता. चांदण्यांनी उजळलेल्या वातावरणात महिलांनी कोजागिरी पौर्णिमेचा आनंद होम मिनिस्टरच्या कार्यक्रमात नृत्य, खेळ, हशा आणि मैत्रीच्या रंगात साजरा केला.

या कार्यक्रमात विविध खेळ आणि मनोरंजक स्पर्धा घेण्यात आल्या. महिलांनी उखाणे स्पर्धा, रिंग फेकणे, फुगे फोडणे आणि नाव घेणे अशा अनेक मनोरंजनात्मक उपक्रमांत सहभाग घेतला. कार्यक्रमात विविध गटांमधील २० विजेत्या महिलांना पैठणी साडीचे बक्षीस देण्यात आले, तर इतर विजेत्यांना आकर्षक बक्षिसे प्रदान करण्यात आली.

अंजली वर्मा, सुप्रिया जाधव, अनुजा जाधव आणि श्रुती मनवेलकर यांच्या हस्ते महिलांना पुरस्कार देण्यात आले. यावेळी दादी नानी ग्रुपच्या अध्यक्षा जयाताई गायकवाड, प्रयासच्या अध्यक्षा रजनी भंडारी, उपाध्यक्ष ज्योती गांधी, राखी आहेर, सचिव उज्वला बोगावात, हिरा शहापुरे, संस्थापक अध्यक्षा अलकाताई मुंदडा, सल्लागार विद्या बडवे, खजिनदार मेघना मुनोत, छाया राजपूत, राखी जाधव, अरुणा गोयल, मंगला गुंदेचा, डॉ. पद्मजा गरुड, सविता मोरे, शशिकला झरेकर, सुजाता कदम, रोहिणी पवार, रेखा मैड, उषा सोनटक्के, उषा सोनी, विद्या कचरे, सुरेखा जंगम, मीरा बेरड, पूर्वा एरंडे, आरती थोरात, नीलिमा पवार, ज्योत्स्ना कुलकर्णी, आशा कापसे, सविता धामट, मीरा पाटील, शारदा होशिंग, स्वाती गुंदेचा, सुनिता काळे, अलका वाघ, प्रतिभा पेंडसे, आरती वाडेकर, जयश्री पुरोहित, रेखा फिरोदिया, आशा गायकवाड, सुशीला त्र्यंबके, माया फसले, हेमा पडोळे आदींसह महिला उपस्थित होत्या.

श्रुती मनवेलकर यांनी महिलांशी संवाद साधून कोजागिरी पौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाच्या प्रारंभी संस्थापक अध्यक्षा अलकाताई मुंदडा यांनी ग्रुपच्या ३२ वर्षांच्या कार्याचा आढावा घेतला. त्यांनी प्रयत्नशील महिलांच्या या मंचाच्या माध्यमातून होत असलेल्या सामाजिक, सांस्कृतिक आणि जनजागृती उपक्रमांची माहिती दिली.

यानंतर सुमित वर्मा यांनी आईला समर्पित करणारे भावस्पर्शी गीत तेरे उंगली पकड केले चला... या गीताने वातावरण भावनिक केले.

सूत्रसंचालन आणि खेळ पैठणीचा हा आकर्षक गेम चेतन गायकवाड यांनी हलक्या फुलक्या शैलीत पार पाडला. संपूर्ण कार्यक्रमात महिलांच्या चेहऱ्यावरचा आनंद, मैत्रीचा ऊबदार भाव आणि आत्मविश्वासाचे तेज झळकत होता. विविध खेळांच्या माध्यमातून महिलांनी उत्साहाने सहभाग नोंदवला. सुमित वर्मा यांच्या वतीने महिलांना पैठणीचे साड्यांचे बक्षीस देण्यात आले.

# सुफी संत ख्वाजा गरीब नवाज दर्शन यात्रेचे २० ऑक्टोबरला नगर शहरातून आयोजन

### शहरातून होणार थेट अजमेरला रवानगी, सात दिवसीय यात्रेचे भाविकांना लाभ घेण्याचे आवाहन



नगर – सुफी संत ख्वाजा मोइनुद्दीन हसन चिश्ती (गरीब नवाज) यांच्या दर्शन यात्रेचे शहरातून आयोजन करण्यात आले आहे. अजमेर (राजस्थान) ला जाण्यासाठी शहरातून कौटुंबिक धार्मिक यात्रेची संधी भाविकांना उपलब्ध होणार असून, हे ७ दिवसीय यात्रेचे नियोजन करण्यात आली असल्याची माहिती यात्रेचे समन्वयक फजल शेख यांनी दिली आहे.

शहरातून थेट अजमेरला जाण्यासाठी रेल्वे अथवा खासगी वाहनांची पुरेशी सुविधा नसल्याने शहरातून विशेष खासगी लक्झरी (स्लिपर) बसने जाण्याची सोय करण्यात आलेली आहे. २० ऑक्टोबर रोजी ही दर्शन यात्रा शहरातून निघणार असून, याचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या यात्रेत अजमेर शरीफ, शरवाड शरीफ, टाटोटी शरीफ, कपासन शरीफ, चितोड गड, जावरा, चाळीस गाव, धुलिया येथील धार्मिक स्थळांना भेट दिली जाणार आहे. या यात्रेत भाविकांची नाश्ता, जेवण, राहण्याची व्यवस्था अल्पखर्चात सेवाभावाने करण्यात आली आहे.

या यात्रेत प्रथम नोंदणी करणाऱ्यांना प्राधान्य राहणार असल्याने अधिक माहिती व नोंदणीसाठी ८०८७७४२८१८ या नंबरवर संपर्क साधण्याचे सांगण्यात आले आहे.

# विवेकानंद स्कूलच्या कार्तिक बनकरची पुणे विभागीय स्केटिंग स्पर्धेसाठी निवड

नगर – जिल्हा अधिकारी कार्यालय व अहमदनगर महानगरपालिका आयोजित आंतरशालेय स्पीड स्केटिंग स्पर्धेत सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलच्या कार्तिक दिपक बनकर याने प्रथम क्रमांक मिळविला. त्याची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.



यामुळे संस्थेचे अध्यक्ष राम मेघानी, प्राचार्य गीता तांबे, उपप्राचार्य कांचन पापडेजा यांनी अभिनंदन केले. तसेच या स्पर्धेसाठी अमोल धोपावकर, नयन तुपे मॅडम, शुभम करपे, सचिन डोंगरे यांचे मार्गदर्शन लाभले. कार्तिक बनकर याची १७ वर्षाखालील गटात (क्वाड स्केटिंग) राज्यस्तरीय डीएसओ स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

प्रशिक्षक शुभम करपे (एआय एम स्पोर्टस् अकादमी, अहिल्यानगर) यांचे प्रेरणा आणि सतत पाठिंब्याबद्दल मनापासून आभार मानले.

# शालेय मनपास्तर रोलर स्केटिंग स्पर्धेत टीम टॉपर्स स्केटिंग अकॅडमीचा विजय

### स्केटिंग स्पर्धेत टिम टॉपर्स अकॅडमीला सर्वाधिक पदके

नगर – महानगरपालिका व जिल्हा क्रिडा कार्यालय आयोजित म.न.पा. शालेय रोलर स्केटिंग स्पर्धा व विभागस्तरीय निवड चाचणी ४ ऑक्टोबर रोजी पार पडल्या. सदर स्पर्धेत ११, १४, १७, १९ वर्ष मुले, मुली तसेच विविध स्केट प्रकार मधे घेण्यात आल्या. या स्पर्धेत शहरातील अनेक शाळांनी सहभाग नोंदविला होता. तसेच स्पर्धेत विविध शाळेतील व येथील टीम टॉपर्स स्केटिंग अकॅडमीच्या अनेक खेळाडूनी सहभाग नोंदणीला होता. यामधे अकॅडमीच्या खेळाडूनी विविध गटात विरोधी स्पर्धकांनशी चुरशीची स्पर्धा करत सर्वाधिक पदके पटकावण्यात यशस्वी ठरले.

टिम टॉपर्स स्कटिंग खेळाडुचा उत्कृष्ट निकाल पुढील प्रमाणे –

११ वर्ष आतील – क्वॉड मुले – प्रथम कार्तिक नन्नावरे (विश्रामबाग शाळा), द्वितीया देव वर्मा (रामकृष्ण स्कूल), तृतीय सर्वम ढवळे (रामकृष्ण स्कूल)

११ वर्ष आतील – इनलाइन मुले द्वितीय प्रणीत पोखर्णा (अशोकभाऊ फिरोदिया स्कूल).,

११ वर्ष आतील – इनलाईन मुली तृतीय झेनभ शेख (रामकृष्ण स्कूल)


शालेय मनपास्तर रोलर स्केटिंग स्पर्धेत टीम टॉपर्स स्केटिंग अकॅडमीच्या संघाने विजेतेपद पटकावले.

१४ वर्ष आतील – क्वॉड मुले., प्रथम – सोहम शिंदे (माऊंट लिटर स्कूल), द्वितीय– वैभव पाटोळे (रामकृष्ण स्कूल)

१४ वर्ष आतील – क्वॉड मुली द्वितीय – स्वरा शिंदे (सेक्रेड हार्ट कॉन्व्हेंट स्कूल)

१७ वर्ष आतील – क्वॉड मुले द्वितीय – संस्कार कुलकर्णी (भाऊसाहेब फिरोदिया शाळा)

१७ वर्ष आतील – इनलाइन मुले तृतीय – कृष्णा सखला (रामकृष्ण स्कूल)

सादर स्पर्धेत अतिवेगवान खेळाडू कार्तिक नन्नवरे, सोहम शिंदे, वैभव पाटोळे यांचे सामने अतिप्रेक्षणीय व उत्तम खेळाचे प्रदर्शन ठरले.

विजेत्या सर्व खेळाडूंना उपमहापौर गणेश भोसले, अकॅडमीचे पद अधिकारी असिफ ईकबाल शेख, प्रविण गायकवाड, संजय नन्नवरे, विशाल साळवे, अक्षय चौधरी यांनी कौतुक करीत अभिनंदन केले व पुढील स्पर्धे करिता शुभेच्छा दिल्या.

वरील सर्व खेळाडू हे अंतरराष्ट्रीय खेळाडू प्रशांत पाटोळे, प्रदीप पाटोळे, पियुष कदम यांच्या उत्कृष्ट मार्गदर्शनाखाली कै. पुंडलिकराव भोसले स्केटिंग रिंक, बुरुडगाव रोड व जिल्हा क्रिडा संकुल, वाडियापार्क येथे नियमित सराव करतात.


पंडित दीनदयाळ व्याख्यानमालेचा प्रचारार्थ बनविलेल्या चित्ररथास नागरिकांचा प्रतिसाद मिळत आहे.

# पंडित दीनदयाळ व्याख्यानमालेचा प्रचारार्थ बनविले चित्ररथ

### नगरकरांचा प्रतिसाद, व्याख्यानमालेचा हायटेक प्रचार : प्रशासकीय अधिकारी सागर उंडे

नगर – पंडित दीनदयाळ व्याख्यानमालेचा प्रचारार्थ बनविलेल्या चित्ररथास नागरिकांचा प्रतिसाद मिळत आहे. नगरकर दरवर्षी व्याख्यानमालेची उत्सुकतेने वाट पाहत असतात. या व्याख्यानमालेच्या माध्यमातून देशभरातील वक्ते अहिल्यानगर मध्ये येऊन समाज प्रबोधन करीत असतात. आत्तापर्यंत सामाजिक, राजकीय तसेच शैक्षणिक, साहित्य, धार्मिक व कलाक्षेत्रातील अनेकांनी या व्याख्यानमालेला हजेरी लावली आहे. या व्याख्यानमालेला नगरकरांनी उपस्थित राहावे. या व्याख्यानमालेचा अहिल्यानगर शहरात हायटेक प्रचार करण्यात येत आहे, असे प्रतिपादन प्रशासकीय अधिकारी सागर उंडे यांनी केले आहे.

पंडित दीनदयाळ व्याख्यानमाला ९ ऑक्टोबर पासून सुरू होणार आहे. या व्याख्यानमालयाच्या प्रचारार्थ डिजिटल चित्ररथ तयार करण्यात आला आहे. या चित्ररथाच्या माध्यमातून वक्त्यांची मुलाखतीचे व्हिडिओ दाखविण्यात येत आहे. हा चित्ररथ शहरातील सावेडी, केडगाव, पाईपलाईन रोड, भिंगार, एमआयडीसी तसेच मध्यशहर, कापड बाजार, चितळे रोड या ठिकाणी जाऊन व्याख्यानमालेच्या प्रचार केला जात आहे. नालेगाव येथील जनकल्याण रक्त केंद्र येथे चित्ररथ पाहताना जनकल्याण रक्त केंद्राचे प्रशासकीय अधिकारी सागर उंडे, स्मिता बडवे, गजेंद्र सोनवणे, जनसंपर्क अधिकारी शरद बळे, गौरव पठाडे, अमित टकले, सचिन शेडाळे, जनार्धन मडूर, मनीषा जोशी, गया चव्हाण, सुलभा पवळ आदी उपस्थित होते.

# पंडित दीनदयाळ व्याख्यानमालेच्या प्रचारार्थ शिक्षकांची बैठक

### राष्ट्र प्रेमाची भावना मनामनात जागविणारी व्याख्यानमाला : प्राचार्य सुनील पंडित

नगर – गेले दहा वर्षापासून पंडित दीनदयाळ व्याख्यानमालेचे अहिल्यानगर शहरात आयोजन करण्यात येत आहे. व्याख्यानमालेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात समाज प्रबोधन होत आहे. या व्याख्यानमालेत पोलीस महासंचालक विश्वास नांगरे पाटील, केरळचे राज्यपाल महामहीम राजेंद्र आर्लेकर, प्रफुल्ल केतकर, फैज खान यांच्यासारखे वक्ते विचार मांडण्यासाठी येणार आहेत. या व्याख्यानमालेसाठी शहरातील शिक्षकांनी उपस्थित राहावे. यासाठी ही बैठक बोलवण्यात आली आहे. व्याख्यानमाला ही मनामनात राष्ट्र प्रेमाची भावना जागविणारी आहे, असे प्रतिपादन मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्राचार्य सुनील पंडित यांनी केले आहे.


भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल येथे ९ ते ११ ऑक्टोबर दरम्यान होणारी व्याख्यानमालेच्या प्रचारार्थ शिक्षकांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल येथे ९ ते ११ ऑक्टोबर दरम्यान होणारी व्याख्यानमालेच्या प्रचारार्थ शिक्षकांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलचे मुख्याध्यापक यू.पी. दुगड, पंडित दीनदयाळ पतसंस्थेचे संस्थापक, चेअरमन वसंत लोढा, मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्राचार्य सुनील पंडित, रुपीबाई बोरा विद्यालयाचे मुख्याध्यापक ए.जे.बारगळ, अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मीडियम स्कूलचे प्राचार्य प्रभाकर भाबड, संतोष भवर उपस्थित होते.

वसंत लोढा म्हणाले, व्याख्यानमालेच्या माध्यमातून शहरातील सांस्कृतिक चळवळीला मोठे बळ मिळत आहे. या व्याख्यानमालेत युवकांना प्रेरित करणारे वक्ते विश्वास नांगरे पाटील, अखिल भारतीय मुस्लिम मंचचे अध्यक्ष फैजखान, महाभारत या टीव्ही मालिकेला ज्यांनी 'मै समय हूं, असा आपला आवाज देऊन ती मालिका अजरामर बनवली. असे प्रख्यात आवाज तज्ञ हरीष भिमाणी, ऑब्झर्वर मासिकाचे नवी दिल्ली येथील मुख्य संपादक प्रफुल्ल केतकर हे या व्याख्यानमालेचे यंदाचे वैशिष्ट्य राहील. केरळचे राज्यपाल राजेंद्र आर्ले कर, जेष्ठ अर्थतज्ज्ञ आणि रेणुका माता मल्टीस्टेटचे अध्यक्ष प्रशांत भालेराव, लेखिका व डॉ.सुधा कांकरिया, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पश्चिमांचल प्रमुख नानासाहेब जाधव आदी व्याख्यानमालेसाठी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. या व्याख्यानमालेसाठी अहिल्यानगरवासीयांनी उपस्थित राहावे.असे आवाहन त्यांनी यावेळी केले. प्राचार्य दुगड सर यांनी आभार मानले.

# प्रज्ञा १३ वे राज्यस्तरीय साहित्य संमेलनामध्ये नगर येथील बाळासाहेब देशमुख 'साहित्य भूषण' पुरस्काराने सन्मानित

नगर – प्रज्ञा बहुउद्देशीय संस्था महाराष्ट्र आयोजित १३ वे 'मराठी साहित्य संमेलन' देगलूर येथे झाले. संमेलन अध्यक्षपदी कवयित्री डॉ. संगीता अवचार या होत्या. याप्रसंगी व्यासपीठावर संस्थापिका सौ. लीना देगलूरकर, आयोजक, गझलकार अनिल कुलकर्णी, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुधाकर बेंद्रे, रवींद्र यशवंतराव, ज्येष्ठ गझलकार मकरंद घाणेकर, स्वागताध्यक्ष ह भ प राजेश महाराज देगलूरकर, उद्घाटन किशोर कुमार मिश्रा हजर होते. याप्रसंगी कथालेखक बाळासाहेब देशमुख यांना साहित्यिक लिखाणा बद्दल 'साहित्य भूषण' पुरस्कार देण्यात आला.

बाळासाहेब देशमुख यांचे आजवर प्रसंगीका, वात्रटिका, ललित लेख, कथा, असे अनेक सदर प्रसिद्ध झालेले आहे.


साहित्यिक बाबा ठाकूर यांच्या हस्ते कथालेखक बाळासाहेब देशमुख यांना 'साहित्य भूषण' पुरस्कार देण्यात आला. याप्रसंगी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुधाकर बेंद्रे, गझलकार मकरंद घाणेकर हजर होते.

साहित्य संमेलन प्रसंगी बोलताना संस्थापिका लीना देगलूरकर म्हणाल्या 'समाजामध्ये अनेक लोक वेगवेगळ्या प्रांतांमध्ये वेगवेगळे कार्य अविरतपणे निष्कामपणे करत असतात. त्यांचे हे कार्य समाजभान, दिशादर्शक असते. अशा वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवरांच्या कार्यांचा येथे सन्मान पुरस्कार रूपाने देताना आम्हाला आनंद होत आहे. कथालेखक बाळासाहेब देशमुख यांनी देखील प्रासंगिका, ललित, कथा, अशा अंगानी आजवर लिहिलेले साहित्य प्रशंसनीय, आणि नोंद घ्यावे असे आहे. अशा कार्यातूनच समाजाला वेगवेगळी दिशा मिळते. प्रबोधन देखील होत असते.' सूत्रसंचालन मकरंद हळदणकर यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन गझलकार अनिल कुलकर्णी यांनी केले.

# लोकांना न्याय देण्यासाठी कायद्याचे शिक्षण महत्त्वाचे

### अनिरुद्ध आडसूळ यांचे प्रतिपादन; आडसूळ विधी महाविद्यालयात प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत

नगर – वकिलीचे शिक्षण केवळ न्यायव्यवस्थेपुरते मर्यादित नसून, समाज घडविण्याचेही साधन आहे. एलएलबी पदवी ही सर्वसमावेशक असून समाजाला न्याय देण्यासाठी कायद्याचे शिक्षण महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन साकेश्वर ग्रामीण विकास सेवा संस्थेचे चेअरमन अनिरुद्ध आडसूळ यांनी केले. शारीरिक तंदुरुस्ती आणि मानसिक बळ या दोन्हींच्या जोपासनेतूनच सशक्त समाजाची निर्मिती होऊ शकते, असा संदेशही त्यांनी या प्रसंगी दिला.


साकेश्वर ग्रामीण विकास सेवा संस्थेच्या आडसूळ विधी महाविद्यालयात प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी मार्गदर्शन करताना अनिरुद्ध आडसूळ बोलत होते.

साकेश्वर ग्रामीण विकास सेवा संस्थेच्या आडसूळ विधी महाविद्यालयात प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी मार्गदर्शन करताना अनिरुद्ध आडसूळ बोलत होते. यावेळी साकेश्वर ग्रामीण विकास सेवा संस्थेच्या सचिव लीना आडसूळ, संस्थेचे संचालक कृष्णा आडसूळ, संस्थेच्या आडसूळ टेक्निकल कॅम्पसचे संचालक डॉ. प्रदीप पाटील, आर्ट्स, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. संभाजी पठारे, विधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रियाज बेग, पॉलिटेक्निकचे प्राचार्य रमेश गडाख, प्राचार्य डॉ. प्रदीप पंडित, प्राचार्य डॉ. संदेश वायाळ, प्राचार्य डॉ. धनंजय लांडगे, प्राचार्य डॉ.प्रवीण अरु, प्रा. श्रुती हलदार, प्रा. क्रांती बागूल, प्रा. प्रदीप गायकवाड आदी उपस्थित होते.

अनिरुद्ध आडसूळ पुढे म्हणाले, कायद्याचे शिक्षण हे केवळ न्यायालयीन प्रक्रिया समजून घेण्यासाठी नाही, तर माणसांमधील हक्क, कर्तव्य आणि जबाबदाऱ्यांचे भान निर्माण करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. आजच्या काळात प्रत्येक नागरिकाने संविधान, कायदे आणि सामाजिक मूल्ये यांचा अभ्यास करून सजग नागरिक म्हणून आपली भूमिका पार पाडणे गरजेचे आहे. तंदुरुस्त शरीर आणि सजग मन या दोन्हींच्या एकत्रित प्रयत्नातूनच सक्षम आणि न्यायप्रिय समाज घडू शकतो. म्हणूनच युवकांनी वकिलीच्या माध्यमातून समाजसेवेचा मार्ग स्वीकारावा आणि लोकांपर्यंत न्याय पोहोचविण्याचे कार्य करावे. विधी महाविद्यालयाचे प्राचार्य रियाज बेग यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना आडसूळ विधी महाविद्यालयाच्या वतीने राबवण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप रोकडे यांनी केले. सपना छिंदम यांनी आभार मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आडसूळ विधी महाविद्यालयाच्या द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# गरमागरम मूग डाळ टिक्की

**झटपट रेसिपी**

दोस्तांनो, शिक्षण किंवा नोकरीनिमित्ताने बाहेरगावी रहाताना घरच्या चवीची आठवण येत असते. रोजच्या धावपळीत झटपट होणारे तेच ते पदार्थ खावे लागतात. मात्र एखाद्या दिवशी निवांत वेळ असल्यावर तुमच्यातला शेफ जागा होतो. मग एखादी वेगळी रेसिपी ट्राय करता येते. अर्थात ही रेसिपी पौष्टिकही असायला हवी. म्हणूनच प्रथिनयुक्त डाळीपासून टिक्की बनवता येईल. यासाठी मूग डाळ वापरता येईल. चला तर मग मूग डाळीची टिक्की बनवू या.

**सामग्री:** एक वाटी मूग डाळ, आल्याचा छोटा तुकडा, दोन हिरव्या मिरच्या, चिरलेली/कोथिंबिर, एक चिरलेला कांदा आणि सिमला मिरची, प्रत्येकी एक चमचा जिरेपूड आणि धनेपूड, एक चमचा कॉर्नफ्लोर, अर्धा चमचा आमचूर, चाट मसाला, ५० ग्रॅम पनीर, मीठ आणि तेल.

**कृती:** एका भांड्यात पाणी गरम करायला ठेवा. त्यात मूग डाळ घालून उकळून घ्या. डाळीतलं पाणी काढून टाका. आता ही डाळ थंड पाण्याने धुवून बाजूला ठेवा. डाळ थंड झाल्यावर मिक्सरच्या भांड्यात डाळ, आलं, हिरवी मिरची आणि कोथिंबिर घालून वाटून घ्या. हे वाटण एका भांड्यात काढा. आता यात चिरलेला कांदा, सिमला मिरची, जिरेपूड, कॉर्नफ्लोर,



आमचूर, चाट मसाला, कुस्करलेलं पनीर आणि मीठ घाला. सर्व घटक नीट मिसळून घ्या. हाताला थोडं तेल लावा. मूग डाळीचं मिश्रण घ्या. त्याला टिक्कीप्रमाणे गोल आकार द्या. अशाप्रकारे सर्व टिक्की बनवून घ्या. गॅसवर तवा ठेवा. त्यावर तेल घाला. गरम झाल्यावर तव्यावर टिक्की ठेवा. दो

# उभे केले कोट्यवधींचे साम्राज्य...

**अचिव्हर**

दक्षिण कोरियाची ऑटो कंपनी 'ह्युंदाई'ला वेगळ्या ओळखीची गरज नाही. आज ती जगातील सर्वात मोठ्या ऑटोमोबाईल साम्राज्यांपैकी एक आहे. या ब्रँडच्या गाड्या लाखो लोकांचे आवडत्या बनल्या आहेत; पण यामागे संघर्ष, कठोर परिश्रम आणि चिकाटीची कथा आहे. ती प्रेरणा देते की परिस्थिती कितीही कठीण असली, तरी अंगी धाडस असेल तर स्वप्ने साध्य करता येतात. ही ह्युंदाईचे संस्थापक चुंग जू-युंग यांची कहाणी आहे. ही एका माणसाची कथा आहे, ज्याला पोट भरण्यासाठी फक्त झाडाची साल खावी लागत होती; परंतु या परिस्थितीवर मात करून त्यांनी जगप्रसिद्ध कार ब्रँड ह्युंदाईची स्थापना केली.


२५ नोव्हेंबर १९१५ रोजी एका गरीब कोरियन शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या चुंग जू-युंग यांचे जीवन संघर्षाचे पुस्तक आहे. त्यांनी त्यांच्या आयुष्यातील प्रत्येक क्षण संघर्षात जगला; परंतु दृढनिश्चय केला, की गरिबी त्यांच्या प्रगतीच्या आड येणार नाही. अभ्यासादरम्यान चुंग जु-युंग यांनी कुटुंबाला मदत करण्यासाठी छोटी छोटी कामे केली; परंतु त्यांचे स्वप्न स्वस्थ बसू देत नव्हते. १९४७ मध्ये त्यांनी एक लहान बांधकाम कंपनी सुरू केली.

सुरुवातीच्या संघर्षांना आणि संसाधनांच्या कमतरतेला न जुमानता, चुंग जु-युंग अढळ राहिले. आधुनिक तंत्रज्ञान शिकण्यासाठी त्यांनी जपान आणि अमेरिकेत प्रवास केला आणि त्यांच्या कंपनीला नवीन उंचीवर नेण्याची योजना आखली. १९६७ मध्ये, त्यांनी 'ह्युंदाई मॅन्युफॅक्चरिंग इंडस्ट्रीज'ची स्थापना केली. हळूहळू कंपनी दक्षिण कोरियाच्या सीमेपलीकडे विस्तारली आणि जगातील आघाडीच्या कार कंपन्यांपैकी एक बनली.

चुंग जु-युंग यांनी हे सिद्ध केले, की कठोर परिश्रम, धैर्य आणि दूरदृष्टीने अशक्य गोष्ट शक्य करता येते. २००१ मध्ये त्यांचे निधन झाले; परंतु त्यांचे जीवन आणि त्यांची कंपनी खो



# ...अन्यथा लवकर म्हातारे व्हाल



**फिटनेस फंडा**

दोस्तांनो, व्यायामामुळे तुम्ही तंदुरुस्त होता. वय वाढण्याची प्रक्रिया मंदावते. सकाळी छान ताजंतवानं वाटतं. हे जरी खरं असलं तरी काही चुकांमुळे तुम्ही खूप लवकर म्हातारे दिसू लागता. व्यायाम करताना कोणत्या चुका होतात? जाणून घेऊ.

* व्यायाम करताना शारीरिक स्थितीचा विचार करा. जीममध्ये व्यायाम करताना चुकीच्या पद्धतीने उभं राहिल्याने, वाकल्याने तुम्हाला त्रास होऊ शकतो. यामुळे पाठीच्या कण्याला बाक येतो. मग तुम्ही वाकून चालू लागता. हे टाळण्यासाठी व्यायाम करताना शरीराच्या स्थितीकडे लक्ष द्या. चुकीच्या शारीरिक स्थितीमुळे तुम्ही म्हातारे दिसू लागता.

* कार्डिओ हा खूप चांगला व्यायामप्रकार असला तरी त्याच्या अतिरेकाने शरीराचं नुकसान होऊ शकतं. विशिष्ट वयानंतर हाडं आणि स्नायूंना पुरेसा व्यायाम मिळाला नाही तर त्यांच्या कार्य मंदावतं. तसंच १८ ते ५० या वयोगटातल्या व्यक्तींनी वेट लिफ्टिंग आणि स्ट्रेंथ ट्रेनिंग करावं, असं एक संशोधन सांगतं. स्ट्रेंथ ट्रेनिंगमुळे स्नायूंना बळकटी मिळते. शिवाय कॅलरीही खर्च होतात.

* 'हाय इंटेंसिटी इंटरवल ट्रेनिंग' गरजेचं आहे. या व्यायामामुळे वय वाढण्याची प्रक्रिया मंदावते. शारीरिक क्षमताही वाढते. या सगळ्यामुळे आपण बराच काळ तरुण रहातो.


* शरीर ताणण्याच्या व्यायामाकडे दुर्लक्ष करू नये. व्यायामाआधी आणि नंतर शरीर ताणायला हवं. शरीर ताणण्याचे व्यायाम केले नाहीत तर स्नायू आणि त्यातल्या टिश्यूंवर अकारण ताण येतो. तसंच या व्यायामामुळे शरीर लवचिक होतं आणि व्यायाम करताना त्रास होत नाही.

* सतत जीममध्ये व्यायाम करत राहिल्याने आपण तंदुरुस्त राहू हा समज चुकीचा आहे. व्यायामाप्रमाणेच शरीराला विश्रांतीचीही गरज असते. स्नायूंची झीज भरून काढण्यासाठी शरीराला वेळ देणं गरजेचं आहे.

# तिच्या पालकांचा विरोध आहे!

**मॅच मेकिंग**

मी २८ वर्षांचा तरुण असून गेल्या चार वर्षांपासून रिलेशनशीपमध्ये आहे. आमच्या दोघांच्या नात्यात जातीचा अडसर आहे. आमची जात वेगळी असल्यामुळे तिच्या घरच्यांच्या आमच्या नात्याला विरोध आहे. आमच्या नात्याबद्दल कळल्यानंतर तिच्या घरच्यांची तिच्याशी अबोला धरला आहे. माझ्या घरातून वडिलांचा पाठींबा आहे. पण मैत्रिणीचे पालक खूपच जुन्या विचारांचे असल्याने त्यांनी तिला सक्त ताकीद दिली आहे. माझ्याशी संपर्क ठेवला तर ते तिचं बाहेर जाणंच बंद केलं जाणार आहे. त्यामुळे तिनेही हे नातं संपवायचं ठरवलं आहे. पण आमचं एकमेकांवर खूप प्रेम आहे. एकमेकांपासून दूर जाण्याचा विचार आम्ही करू शकत नाही. अशा परिस्थितीत मी काय करू?



उत्तर : तुमचं नातं खूपच गुंतागुंतीचं होऊन बसलं आहे. अशा परिस्थितीत तिच्या पालकांना समजावून सांगणं गरजेचं आहे. यासाठी कोणीतरी पुढाकार घ्यायला हवा. तुझ्या मैत्रिणीला पालकांशी बोलायची भीती वाटत असेल तर नात्यातल्या काही लोकांना याची जबाबदारी देता येईल. नात्याला असणारा विरोध ही बाब फारच नाजूक आहे. मुलीच्या पालकांचं मन वळवण्यासाठी बरीच मेहनत करावी लागेल. तुम्हाला धीर धरावा लागेल. त्यांची समजूत घालणं नक्कीच सोपं नाही. यासाठी सातत्याने प्रयत्न करावे लागतील. पण तू धीर सोडू नकोस. तुला नक्कीच मार्ग मिळेल.

# कलाक्षेत्र खुणावतेय?

**वेगळ्या वाटा**

चित्रकला, सृजनशीलता आणि अभिव्यक्तीची आवड असणाऱ्यांसाठी 'बीएफए' हा करिअरचा उत्तम मार्ग ठरतो. यामध्ये केवळ कला शिकवली जात नाही तर ती एक व्यावसायिक कौशल्य बनवून स्वतःचे स्थान निर्माण करण्याचा विचार यातून दिला जातो. आजच्या घडीला पारंपरिक शिक्षणाच्या पलीकडे जाऊन अनेक विद्यार्थी सृजनात्मक आणि कलात्मक क्षेत्रांकडे वळत आहेत. विशेषतः कला आणि डिझाईनमध्ये रस असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी 'बॅचलर ऑफ फाइन आर्ट्स' हा एक उत्तम आणि भविष्यकाळात संधी देणारा पर्याय ठरतो. या पदवीअंतर्गत विद्यार्थ्यांना कलाक्षेत्रातील विविध अंगांमध्ये सखोल प्रशिक्षण दिले जाते. ते कलागुणांना व्यावसायिक स्वरूपात विकसित करण्यास मदत करते.



**'बीएफए' म्हणजे नेमके काय?**

'बॅचलर ऑफ फाइन आर्ट्स' ही चार वर्षांची पदवी असून ती संगीत, नृत्य, नाट्य, चित्रकला, मूर्तिकला, ॲनिमेशन, ग्राफिक डिझाईन, फोटोग्राफी, फॅशन डिझाईन आणि आर्ट हिस्टरी अशा विविध कलात्मक शाखांमध्ये मिळवता येते. ही पदवी केवळ कलात्मक शिकवणीपुरती मर्यादित नसून सैद्धांतिक ज्ञान, सौंदर्यदृष्टी, इतिहास आणि सृजनशीलतेतेही शिक्षण यात दिले जाते.

**कोण करू शकतो 'बीएफए?**

'बीएफए'मध्ये प्रवेश घेण्यासाती विद्यार्थ्यांनी १२वी उत्तीर्ण केलेली असावी. काही विद्यापीठांमध्ये कलाशाखेतील १२वीचा अभ्यासक्रम आवश्यक असतो तर काही ठिकाणी सर्व शाखांमधील विद्यार्थी पात्र असतात. याशिवाय अनेक संस्था प्रवेशासाठी 'अप्टिट्यूड टेस्ट' किंवा पोर्टफोलिओ सबमिशनही घेतात.

**काय शिकवले जाते या कोर्समध्ये?**

या कोर्समध्ये विद्यार्थ्यांना रंगसंगती, रेखाटन, फिगर ड्रॉइंग, व्हिज्युअल स्टोरीटेलिंग, थ्री डी डिझाईन, डिजिटल आर्ट्स, फोटोग्राफी, स्कल्पचर आणि विविध माध्यमांचा वापर शिकवला जातो. यासोबतच आर्ट हिस्ट्री, सौंदर्यशास्त्र आणि कलेचं समाजाशी नातं या गोष्टींचंही ज्ञान दिले जाते.

**करिअरच्या संधी कोणत्या?**

'बीएफए' पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना अनेक क्षेत्रांमध्ये करिअर करता येते. चित्रकार, ग्राफिक डिझायनर, ॲनिमेटर, आर्ट डायरेक्टर, फॅशन डिझायनर, इन्टिरियर डिझायनर, टॅटू आर्टिस्ट, फोटोग्राफर, आर्ट टीचर किंवा ॲकॅडेमिक रिसर्चर अशा अनेक संधी त्यांच्या समोर खुल्या असतात. विविध जाहिरात कंपन्या, मीडिया हाऊसेस, एनिमेशन स्टुडिओ, थिएटर ग्रुप्स आणि डिझाईन फर्म्समध्ये या क्षेत्रातील तज्ज्ञांची मोठी मागणी आहे.

**स्वतंत्र कलाकार म्हणूनही संधी**

या क्षेत्रातील आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे स्वतंत्र कलाकार म्हणून काम करण्याची मिळणारी संधी. चित्रकार, छायाचित्रकार, शिल्पकार किंवा डिजिटल कलाकार म्हणून आपण स्वतःचे ब्रँड तयार करू शकतो. 'सोशल मीडिया'च्या युगात ही संधी अधिक व्यापक बनली आहे.

# जोश

## शेर की जुबानी


एक परवाह ही बताती है कि
ख्याल कितना है,
वरना कोई तराजू नहीं होता,
रिश्तों में।

जिंदगी गुजर जाए, पर
दोस्ती कम ना हो,
याद हमें रखना चाहे
पास हम ना हो।

काश दिल की आवाज में
इतना असर हो जाए,
हम याद करें और उसको
खबर हो जाए।

**ॲप स्टोरी**

## लॅपटॉप चालणार ॲंड्राईडवर



आता मोबाईलप्रमाणे लॅपटॉपही ॲंड्रॉइडवर चालणार आहेत. 'गुगल' ने 'क्वालकॉम' बरोबर भागीदारी करून याची तयारी केली आहे. 'गुगल'ने यापूर्वीच 'क्रोमओएस' चलित लॅपटॉप विकसित केले आहेत; परंतु ते विंडोज आणि मॅकच्या तुलनेत वेगळी ओळख निर्माण करण्यात अयशस्वी ठरले. आता ॲंड्रॉइड ऑपरेटिंग सिस्टमसह नवीन लॅपटॉप लॉंच करण्याची तयारी सुरू आहे. 'गुगल' ने जाहीर केले, की पुढच्या वर्षी ॲंड्रॉइडची पीसी आवृत्ती लॉंच केली जाईल. अद्याप या संबंधीची तपशीलवार माहिती शेअर केली गेलेली नसली तरी गुगल २०२६ मध्ये त्याची घोषणा करण्याचा अंदाज आहे. यामुळे वापरकर्त्यांना एकाच ठिकाणी मोबाइल आणि पीसी सेवांचा आनंद घेता येईल. 'क्रोमओएस' आणि 'ॲंड्रॉइड'चा अनुभव लक्षात घेता मानले जाते, की 'गुगल ॲंड्रॉइड' सारखा इंटरफेस आणि 'क्रोमओएस'च्या मल्टीटास्किंग स्वरूपासह एक नवीन प्लॅटफॉर्म विकसित करेल. या दोघांना एकत्र केल्याने पीसी आणि लॅपटॉपसाठी एक नवीन ऑपरेटिंग सिस्टम तयार होईल.

**नेटवर्कींग**


## 'लिंक्डइन'मुळे गोपनीयता धोक्यात



नोकरी शोधण्यासाठी 'लिंक्डइन' हा सर्वात मोठा व्यावसायिक नेटवर्किंग प्लॅटफॉर्म मानला जातो. तथापि, लवकरच या ॲपमध्ये काही बदल संभवत असून यामुळे वापरकर्त्यांची गोपनीयताही धोक्यात येऊ शकते. याचे कारण कंपनी आपल्या गोपनीयता धोरणात मोठे बदल करत आहे. कंपनीने जाहीर केले आहे, की तीन नोव्हेंबरपासून 'मायक्रोसॉफ्ट'ला 'एआय मॉडेल्स'ना प्रशिक्षण देण्यासाठी तसेच वैयक्तिकृत जाहिराती देण्यासाठी वापरकर्त्यांचा डेटा वापरण्याची परवानगी दिली जाईल. म्हणजेच 'लिंक्डइन'नुसार प्रोफाइल कामाचा इतिहास, शिक्षण तपशील, पोस्ट आणि टिप्पण्या यासारख्या डेटाचा वापर केला जाईल. तथापि, कंपनीने स्पष्ट केले आहे, की खासगी संदेश पूर्णपणे सुरक्षित राहतील आणि कोणत्याही प्रकारे शेअर केले जाणार नाहीत. या बदलात दोन महत्त्वाचे घटक समाविष्ट आहेत. पहिला, सामग्री-निर्मिती करणारे 'एआय मॉडेल्स' सुधारण्यासाठी वापरकर्त्यांची क्रियाकलाप आणि माहिती वापरली जाईल. याव्यतिरिक्त, जाहिराती अधिक वैयक्तिकृत करण्यासाठी 'मायक्रोसॉफ्ट' आणि त्याचे भागीदार वापरकर्त्यांच्या डेटामध्ये प्रवेश मिळवतील. असे असले तरी लिंक्डइनने वापरकर्त्यांना 'एआय' प्रशिक्षण किंवा जाहिरातींसाठी त्यांचा डेटा वापरण्यापासून दूर राहण्याचा पर्याय दिला आहे. वापरकर्ते कधीही संमती रद्द करू शकतात.

**सोशल मीडिया**

## 'मेटा'चे नवे फीचर




'मेटा' सोशल मीडियात वादळ निर्माण करणार आहे. नुकतेच त्यांनी 'व्हायब्स' नावाचा एक नवीन 'एआय व्हिडीओ फीड लॉंच' केला आहे. तिथे वापरकर्ते 'एआय-जनरेटेड' व्हिडीओ तयार आणि रीमिक्स करू शकतील. 'सोशल कंटेंट'मध्ये नवीन श्रेणी तयार करण्यासाठी कंपनीने हे धाडसी पाऊल उचलले असून हे 'टिकटॉक' सारख्या इतर प्लॅटफॉर्मना आव्हान देईल. 'मेटा'ने या फीडद्वारे 'एआय-जनरेटेड कंटेंट'वर डाव खेळला आहे. 'व्हायब्स' मेटा एआय ॲप आणि वेबसाइटद्वारे ॲक्सेस करता येते. हा एक प्रकारचा 'एआय चॅटबॉट' असून तो क्रिएटिव्ह हब म्हणून काम करेल. उदाहरणार्थ, सध्या तुम्हाला 'सोशल मीडिया'वर इतरांनी तयार केलेले व्हिडीओ दिसतात; परंतु 'व्हायब्स'वर 'एआय'ने तयार केलेले व्हिडीओ मानवी प्रॉम्प्टनंतर दिसतील. एखादा व्हिडीओ आवडला तर प्लॅटफॉर्म तो रीमिक्स करण्याचा पर्याय देईल. तुम्ही यात संगीत जोडू शकता, व्हिज्युअल बदलू शकता किंवा आवडीचा नवीन प्रॉम्प्ट देऊन पूर्णपणे नवीन व्हिडीओही तयार करू शकता. 'टिकटॉक'शी नवीन पद्धतीने स्पर्धा करण्यासोबतच, 'मेटा'ने एक नवीन श्रेणीदेखील दिली आहे. काही दिवसांपूर्वीच, एलन मस्क यांनी घोषणा केली, की बंद पडलेले वाईन ॲप आता पुन्हा सुरू केले जाऊ शकते. त्यात 'एआय-जनरेटेड' व्हिडीओंचा समावेश आहे. 'मस्क' यांच्या योजना पूर्ण होण्यापूर्वीच 'मेटा'ने एक नवीन प्लॅटफॉर्म लॉंच केला आहे.

# करिअर कसे निवडाल ?

**करीअरवेध**

दहावीचा टप्पा पार करतो न करतो तोच पुढे काय करायचे हा तोच प्रश्न पडू लागतो. पण आपल्याला नेमके कशात करियर करायचे आहे, हे बऱ्याच विद्यार्थ्यांना पदवीचे शिक्षण पूर्ण होईपर्यंतही कळत नाही. कारण बऱ्याचदा निवडलेले करियर पालकांच्या, इतरांच्या सल्ल्याने निवडलेले असते. त्यामुळे पुढची सगळीच गणिते चुकत जातात. हा धोका टाळण्यासाठी योग्य वेळी, योग्य वयात, योग्य करियर निवडणे खूप गरजेचे असते.

आपल्याला काय करायचे आहे आणि आपण काय करत आहोत याचा विचार स्पष्ट नसला, यात घोळ झाला तर अनेक समस्या निर्माण होतात. एकवेळी यातून आपल्याला पैसे मिळतातही पण कामाचे समाधान मात्र कधीही मिळत नाही. म्हणून, करियर निवडताना खूप सावध राहायला हवे. जसे की, करियर निवडण्यापुढे स्वत:ला काही प्रश्न विचारणे गरजेचे आहे. ते म्हणजे मी कोण आहे, माझी तत्व काय आहेत, मला काय करायला आवडते, मला काय येते, आपण काय पेलू शकतो, माझ्यात कोणती कौशल्ये आहेत... प्रत्येकाने या प्रश्नांची उत्तरे मिळवायला हवीत. एकदा ती मिळाली की नेमके कोणत्या क्षेत्रात पुढे जायचे हे निश्चित होईल आणि करियर निवडणे सोपे जाईल.




बऱ्याचदा आपल्यापुढे अनेक पर्याय असतात. खूप काही येत असते आणि खूप काही करावेसे वाटत असते. अशावेळी त्यातले सर्वात जास्त काय आवडते, कोणती आवड आपण काम म्हणून स्वीकारली तर बराच काळ सांभाळू शकतो हे विचारात घ्यावे. एकदा याची खात्री झाली की करियर निवडणे अधिक सोपे होईल. करियर निवडताना आपणच आपले मूल्यमापन करणे गरजेचे ठरते. आपले शिक्षण काय, पात्रता काय, अंगी कोणते गुण आहेत हे पारखणे गरजेचे असते. पात्रतेनुसार कोणते क्षेत्र आपल्याला करियर करण्यासाठी योग्य आहे याचा विचार नक्की करावा कारण पुढे जाऊन निवडलेल्या क्षेत्रात यशस्वीरित्या काम करणे ही मोठी जबाबदारी असते.

**पुढचा विचार महत्त्वाचा**

करियर निवडताना आवड लक्षात घेतल्यानंतर सगळ्यात महत्त्वाचा भाग म्हणजे आपण स्वत:ला कुठे पाहतो. कारण करियर निवडायचे असेल तर आपल्यापुढे एक लक्ष्य असायला हवे. पुढच्या पाच ते दहा वर्षात मला कोणत्या विशिष्ट ठिकाणी पोहोचायचे आहे हे निश्चित असायला हवे. मग ते एखादे पद असेल, उपाधी असेल किंवा आर्थिक वृद्धी असेल. त्याचा विचार करूनच करियर निवडावे. त्यामुळे तिथे पोहोचणे सोपे होते.


जगण्यासाठी लागतो तो पैसा. हल्लीच्या महागाईच्या जगात तर पैशाशिवाय काहीच शक्य नाही. त्यामुळे आपण निवडतो आहोत, त्या क्षेत्रातून पैसे कसे मिळवायचे, त्यात जास्त पैसे मिळत नसतील तर पूरक आणि पोषक असे दुसरे कोणते क्षेत्र आहे, त्याचाही विचार करायला हवा. कारण समाधानासोबत आर्थिक गरज भागणे तितकेच महत्त्वाचे आहे.

# शेरवानी खरेदी करताय?

**स्टाईल स्टेटमेंट**

एक काळ असा होता, की लग्नाच्या तयारीत वधूची अधिक लगबग असे. परंतु आजकाल वरालाही लग्नाच्या दिवशी खास दिसायचे असते. अर्थातच यासाठी परिपूर्ण पोशाख असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. हे लक्षात घेता अनेकजण शेरवानीला प्राधान्य देतात. मात्र शेरवानी खरेदी करताना काही लहानसहान गोष्टीही लक्षात ठेवल्या पाहिजेत. त्याकडे दुर्लक्ष झाले तर लूक बिघडू शकतो.

पहिली बाब म्हणजे शेरवानी योग्य आकारात नसेल तर लूक खराब होऊ शकतो. खूप सैल किंवा अति घट्ट शेरवानीत योग्य लूक मिळणे कठीण आहे. आरामदायी वाटेल आणि स्टायलिश दिसेल असे फिटिंग असणे गरजेचे आहे. हे लक्षात घेता इतरांच्या आवडीनुसार शेरवानी निवडू नका. लग्नाची थीम आणि तुमच्या त्वचेच्या रंगावर आधारित शेरवानीचा रंग निवडा. शेरवानींसाठी काही रंग सदाहरित मानले जातात. त्यात सोनेरी, क्रीम आणि पांढऱ्या रंगाचा समावेश होतो. आजकाल मुलांमध्ये पेस्टल रंगाच्या शेरवानीदेखील लोकप्रिय आहेत. कधीही स्वस्त स्त्रोताकडून शेरवानी खरेदी करू नका.



शेरवानीची गुणवत्ता चांगली असावी. चांगल्या मटेरियलपासून बनवलेले हे देखणे कपडे जास्त काळ टिकतात आणि चांगला लूक देतात. शेरवानी आयुष्यभर जपली जाते कारण त्यात लग्नाच्या आठवणी असतात. तेव्हा थीमनुसार हलकी किंवा भरजरी काम केलेली शेरवानी निवडा. अर्थात जास्त भरतकाम आवडत नसेल तर अशी शेरवानी टाळा. दुसरे म्हणजे वराचा लूक केवळ शेरवानीने पूर्ण होत नाही. तेव्हा पगडी, शूज, नेकपीस किंवा अंगठी आदी ॲक्सेसरीजही शेरवानीशी पूर्णपणे जुळत असल्याची खात्री करा.

पूर्वी कॉन्ट्रास्टिंग ॲक्सेसरीज घालण्याचा ट्रेंड असायचा; परंतु आता वर चप्पलांपासून पगडीपर्यंत सर्व काही शेरवानीशी जुळणारे घालतात. हा ट्रेंड लक्षात घ्या. कधीही एका दिवसात शेरवानी खरेदी करू नका. प्रथम आपल्याला काय शोभते आणि काय ट्रेंडिंग आहे हे पाहण्यासाठी बाजारात फेरफटका मारा. ट्रायल घेऊन काळजीपूर्वक विचार केल्यानंतर निवड अंतिम करा. डिलिव्हरी घेण्यापूर्वी लूक परिपूर्ण असल्याची खात्री करणारी ट्रायलही अवश्य घ्या.

# पोपट फुले यांना न्याय द्या, आरोपींवर कारवाई करा

## सत्यशोधक अण्णाभाऊ साठे स्मारक प्रतिष्ठानची मागणी

नगर – डोणगाव (ता. जामखेड, जि. अहिल्यानगर) येथील ग्रामपंचायत सदस्य पोपट माणिक फुले यांच्यावर जीवघेणा हल्ला झाल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. सामाजिक न्यायासाठी व दारूबंदीच्या लढ्यासाठी ओळखले जाणारे फुले यांना गावातील काही समाजकंटकांकडून मारहाण व जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. या घटनेविरोधात सत्यशोधक अण्णाभाऊ साठे स्मारक प्रतिष्ठानच्या वतीने पोलीस अधीक्षकांना निवेदन देऊन आरोपींवर कठोर कारवाईची मागणी करण्यात आली.

२७ सप्टेंबर २०२५ रोजी आरोपी सुभाष यमाजी धनवे यांनी किरकोळ कारणावरून फुले यांच्या तोंडावर मारहाण करून त्यांना जीवे मारण्याची धमकी दिली होती. याबाबत फुले यांनी २९ सप्टेंबर रोजी जामखेड पोलीस ठाण्यात अर्ज दाखल करून संरक्षणाची मागणी केली होती. मात्र, संबंधित पोलीस अधिकाऱ्यांनी कोणतीही कार्यवाही न केल्याने आरोपींचे मनोबल वाढले. यानंतर २ ऑक्टोबर २०२५ रोजी दसऱ्याच्या दिवशी आरोपी सुभाष धनवे, सुजित धनवे, अभिजीत उर्फ तात्या धनवे यांनी फुले यांच्यावर सायकलची चैन, लोखंडी रॉड, केबलसह हल्ला चढवून गंभीर जखमी केले. त्यांच्या अंगावर जखमांच्या खुणा असून सध्या ते उपचार घेत आहेत. या हल्ल्यात त्यांच्या पत्नी व मुलीवरही हल्ला करून त्यांच्यावर लज्जास्पद वर्तन करण्यात आले.



पोपट फुले यांना न्याय देवून आरोपींवर कठोर कारवाई करा, या मागणीचे निवेदन सत्यशोधक अण्णाभाऊ साठे स्मारक प्रतिष्ठानच्यावतीने पोलिस अधीक्षकांना देण्यात आले.

या प्रकरणात पोलिसांनी तक्रार दाखल केली असली तरी योग्य कलम लागू न केल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे आरोपींवर कठोर कारवाई करावी आणि निष्काळजी पोलीस अधिकाऱ्यांवरही चौकशी करून कार्यवाही करावी, अशी मागणी सत्यशोधक अण्णाभाऊ साठे स्मारक प्रतिष्ठानतर्फे करण्यात आली असून या मागणीचे निवेदन देताना शासनाचा समाजभूषण पुरस्कारप्राप्त नामदेवराव चांदणे, भारतीय लहुजी सेनेचे पश्चिम महाराष्ट्र प्रमुख सुनिल सकट, तसेच शाहु–फुले–आंबेडकर–साठे कला सामाजिक विचारमंचाचे अध्यक्ष अशोक शिंदे आदी पदाधिकारी उपस्थित होते. तसेच सर्व पदाधिकाऱ्यांनी शासकीय जिल्हा रुग्णालयात जाऊन पोपट फुले यांची भेट घेतली व न्याय मिळेपर्यंत लढा सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला.

# आधार कार्ड अपडेटसाठी विद्यार्थ्यांकडून आकारली जातेयं जास्त अवाजवी रक्कम

## अवाजवी फी थांबवावी : वंचित बहुजन आघाडीची मागणी

नगर – जिल्ह्यातील विविध UIDAI केंद्रांवरून ५ ते १७ वयोगटातील विद्यार्थ्यांचे आधार कार्ड बायोमेट्रिक अपडेट करताना शासनाच्या नियमावलीकडे दुर्लक्ष करून विद्यार्थ्यांकडून १०० रुपये किंवा त्यापेक्षा जास्त रक्कम आकारली जात असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. प्रत्यक्षात ५ ते ७ वर्षे आणि १५ ते १७ वर्षे वयोगटातील मुलांचे अनिवार्य बायोमेट्रिक अपडेट मोफत असणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष योगेश रघुनाथ साठे यांनी जिल्हाधिकारी पंकज आशिया यांना निवेदन दिले आहे. यात संबंधित सर्व UIDAI सेंटरला शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांकडून पैशांची अवाजवी वसुली करणाऱ्या केंद्र चालकांवर कायदेशीर कारवाई करावी आणि त्यांचा परवाना रद्द करावा, अशीही मागणी दिलेले निवेदनात करण्यात आली आहे.

जिल्हाध्यक्ष योगेश साठे यांनी आवाहन केले की, जो कोणी ५ ते १७ वयोगटातील विद्यार्थ्यांकडून आधार कार्ड अपडेट करण्यासाठी पैसे आकारील त्याची पावतीसह तक्रार जिल्हाधिकारी कार्यालय येथे करावी किंवा वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांकडे करावी असे आवाहन केले. यावेळी जिल्हाध्यक्ष योगेश साठे, जिल्हा महासचिव प्रसाद भिवसने, भिंगार शहराध्यक्ष राजीव भिंगारदिवे, जिल्हा संघटक सुधीर ठोंबे, शहराध्यक्ष हनीफ शेख, जिल्हा सल्लागार जे डी शिरसाठ, नगर तालुकाध्यक्ष रविकिरण जाधव, युवा शहराध्यक्ष ॲड.योगेश गुंजाळ, प्रवीण ओरे, गणेश राऊत, सुरेश पानपाटील, फिरोज पठाण, बुद्धभूषण भिवसने, अजित कुऱ्हाडे, संकेत शिंदे, कौशिक गाडे, देविदास भालेराव आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# शांघाई येथे आयोजित जागतिक कौशल्य स्पर्धाच्या नोंदणीसाठी आता १५ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ

नगर – जागतिक कौशल्य स्पर्धा २०२६ चे आयोजन शांघाई येथे होणार आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठीची अंतिम मुदत ३० सप्टेंबर होती. आता नोंदणीसाठी १५ ऑक्टोबर पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. इच्छुक व पात्र उमेदवारांनी https://www.skillindiadigital.gov.in या वेब पोर्टलवर नोंदणी करावी, असे आवाहन प्र. सहायक आयुक्त रविकुमार पंतम यांनी केले.

जागतिक कौशल्य स्पर्धा ही जगातील सर्वात मोठी व्यावसायिक शिक्षण व कौशल्य उत्कृष्टता स्पर्धा असून ती दर दोन वर्षांनी आयोजित केली जाते. जगभरातील २३ वर्षाखालील तरुणांना आपली कौशल्ये सादर करण्याची ही संधी ऑलिंपिक खेळांच्या तोडीची प्रतिष्ठा लाभलेली आहे. यापूर्वी झालेल्या ४७ व्या जागतिक कौशल्य स्पर्धेत ५० देशांतील १० हजारांहून अधिक उमेदवारांनी ६३ क्षेत्रांमध्ये सहभाग घेतला होता. स्पर्धा १५ देशांत तब्बल १२ आठवडे चालली होती.

२०२६ च्या जागतिक स्पर्धेसाठीच्या पूर्वतयारीच्या दृष्टीने ६३ क्षेत्रांशी निगडित जिल्हा व राज्यस्तरावरील कौशल्य स्पर्धा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय व विविध औद्योगिक आस्थापनांच्या सहकार्याने आयोजित करण्यात येत आहेत. जिल्हा, विभाग, राज्य व देश पातळीवरील स्पर्धांमधून निवड झालेल्या उमेदवारांची नावे जागतिक नामांकन प्रक्रियेसाठी पाठविली जातील.

या स्पर्धेसाठी वयोमर्यादा हा एकमेव निकष असून पन्नास क्षेत्रांसाठी उमेदवाराचा जन्म १ जानेवारी २००४ किंवा त्यानंतरचा असावा. तर डिजिटल कन्स्ट्रक्शन, क्लाऊड कंप्युटिंग, सायबर सुरक्षा, आयसीटी नेटवर्क सुरक्षा, ॲडिटिव्ह मॅन्युफॅक्चरिंग, इंडस्ट्रियल डिझाईन टेक्नॉलॉजी, इंडस्ट्री ४.०, मेकाट्रॉनिक्स, रोबोट सिस्टीम इंटीग्रेशन, वॉटर टेक्नॉलॉजी व एअरक्राफ्ट या क्षेत्रांसाठी उमेदवाराचा जन्म १ जानेवारी २००१ किंवा त्यानंतरचा असणे आवश्यक आहे. शांघाई येथे होणाऱ्या जागतिक कौशल्य स्पर्धा २०२६ साठी प्रतिभासंपन्न उमेदवारांची निवड होण्यासाठी जिल्हा, विभाग, राज्य व देश पातळीवरील सर्व प्रशिक्षण संस्था तसेच महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी अंतर्गत व्यवसाय प्रशिक्षण संस्थांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले.

# हैदराबाद गॅझेटनुसार बंजारा समाजाला एसटी आरक्षण द्या

## बंजारा समाजाचा मोर्चा

नगर – हैदराबाद गॅझेटीयर व सी पी बेरार गॅझेटिअरमध्ये बंजारा समाज हा आदिवासी अनुसूचित जमातीमध्ये समाविष्ट असल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. तसेच लमाण बंजारा समाज हा आदिवासी अनुसूचित जमातीचे असल्याचे सर्व निकष पूर्ण करत आहे. तसेच आजही हा समाज आर्थिक, शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या भरपूर प्रमाणात मागास आहे. आजही लमाण बंजारा समाजास लोकसंख्येच्या प्रमाणात राजकीय प्रतिनिधित्व मिळालेले नाही. आजही बहुतांश लमाण बंजारा समाज हा ऊस तोडणीचे, मजुरीचे तसेच भटकंती करून आपला उदरनिर्वाह करण्याचे काम करत आहे. आजही बंजारा समाजाचा नोकरीमध्ये भरपूर प्रमाणामध्ये अनुशेष शिल्लक आहे.



हैदराबाद गॅझेटनुसार बंजारा समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण मिळावे या मागणीसाठी बंजारा समाजाच्या वतीने अहिल्यानगरमध्ये मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात बंजारा समाज बांधव सहभागी झाले होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कायदामंत्री असताना दि. २८.०२.१९५२ मध्ये खासदार जयपालसिंग बिहार व संविधान मसुदा समिती सदस्य यांनी लमाण बंजारा जमातीस SC किंवा ST मध्ये सामावून घेण्याची मागणी केली होती.

त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या कार्यकाळात दि. २६ फेब्रुवारी व ३० मे १९६८ रोजी व त्याच प्रमाणे मागील काळात सन १९७८ व दि. २० मार्च १९७९ अशा ३ वेळा केंद्राकडे शिफारस करण्यात आली व संसदेत त्याबाबतचे विधेयक मांडण्यात आले. त्या विधेयकानुसार केंद्र शासनाकडून यावेळी कर्नाटक, आंध्रप्रदेश व इतर राज्यात SC तर काही ठिकाणी ST असे एकूण १४ राज्यात संविधानिक आरक्षण देण्यात आले. इतर ठिकाणी OBC व तत्सम प्रवर्गात आरक्षण दिले गेले. आज पर्यंत नेमलेल्या सर्व आयोगांनी स्पष्टपणे हे लमाण–बंजारा समाज आदिवासी असल्याचे मान्य केले आहे. बंजारा समाजाचे धर्मगुरु डॉ. रामराव महाराज यांनी सुद्धा या मागासलेल्या समाजाला जमातीमध्ये समाविष्ट करुन घेण्यात यावे यासाठी अनेक आंदोलने केली तसेच राज्य व केंद्र सरकारकडे त्यासाठी पाठपुरावा केला होता. त्यामुळे आदिवासी समाजाच्या टक्केवारीस हात लावता स्वतंत्र आदिवासी (ब) यादी तयार करावी, कारण अभ्यासासाठी नेमलेल्या समित्या मुंशी कमिशन रिपोर्ट १९२४, ऑल इंडिया जेल कमिशन रिपोर्ट, डॉ. बि.के. अंतरोळीकर कमिशन रिपोर्ट १९५०, देशमुख कमिशन रिपोर्ट, थाडे कमिशन रिपोर्ट आणि न्यायमुर्ती बापट आयोग या सर्व आयोगांनी एकमुखाने अशी शिफारस केलेली आहे की, लमाण–बंजारा समाजही जमात आहे आणि त्याचा समावेश अनुसूचित जमातीतच झाला पाहिजे. तरी या सर्व बाबींचा विचार करून व बंजारा समाजाचा सरकारने अंत न पाहता तात्काळ आदिवासी आरक्षणास बाधा न आणता लमाण गोर बंजारा समाजाचा स्वतंत्ररित्या अनुसूचित जमातीमध्ये समावेश करण्याबाबतची शिफारस केंद्र सरकारकडे करावी व महाराष्ट्रातील सर्व गोरबंजारा समाज बांधवास अनुसूचित जमातीमध्ये समाविष्ट करण्यासाठी आपल्या स्तरावरून योग्य कार्यवाही करावी ही सकल गोर बंजारा समाज बांधव अहिल्यानगरच्या वतीने मागणी करण्यात येत आहे. निवेदनावर प्रभाकर पवार, मोहन जाधव, रामभाऊ राठोड, रमेश चव्हाण, विजय राठोड आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# राज्य माहिती आयुक्तांच्या उपस्थितीत ८ ऑक्टोबर रोजी चर्चासत्र

नगर – माहिती अधिकार सप्ताहानिमित्त, राज्य माहिती आयोगाच्या नाशिक खंडपीठाचे राज्य माहिती आयुक्त भूपेन्द्र गुरव यांच्या अध्यक्षतेखाली ८ ऑक्टोबर रोजी दुपारी १२ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील पंडित जवाहरलाल नेहरु सभागृहात चर्चासत्र आयोजित केले जाणार आहे.

जिल्हा प्रशासनाकडून सर्व जनमाहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी व माहिती अधिकार कार्यकर्ते व नागरिकांनी या चर्चासत्रास उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# शेतकऱ्यांना पीक कर्जमाफी तातडीने करावी अन्यथा २७ ऑक्टोबरला रास्ता रोको

नगर – महाराष्ट्र राज्यात १४ ते ३० सप्टेंबर या कालावधीमध्ये राज्यात मुसळधार तसेच अतिमुसळधार पाऊस पडल्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे, पशुधनाचे, तसेच घरांची पडझड याबाबत मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. शेतकऱ्यांनी बँकेकडून कर्ज घेऊन पिकांची पेरणी केलेली आहे. शेतकऱ्यांना पिकांची नुकसान भरपाई देणे तसेच पीक कर्जमाफी करणे हे गरजेचे आहे. याबाबत मंत्रिमंडळाने कॅबिनेट बैठक आयोजित करून शेतकऱ्यांच्या पिकांची नुकसान भरपाई देणे तसेच शेतकऱ्यांना पीक कर्जमाफी करणेबाबत तातडीने कार्यवाही करावी. याबाबत राज्य सरकारने योग्य निर्णय घ्यावा अन्यथा २७ ऑक्टोबर रोजी दुपारी २ वाजता चांदणी चौक, अहिल्यानगर येथे रस्ता रोको आंदोलन करणार असून, याची जबाबदारी राज्य सरकारची असेल, असे निवेदनवजा इशारा कुत्तरवाडी, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर येथील तुळशीराम सानप यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, महसूल मंत्री, सहकार मंत्री, मदत व पुनर्वसन मंत्री, जलसंपदामंत्री, (विखे पाटील), जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांना दिला आहे.

# धनादेश न वटल्याच्या फौजदारी खटल्यात आरोपीस कैद व नुकसान भरपाईची शिक्षा

नगर – ऊसनवार घेतलेल्या रकमेच्या परतफेडीपोटी दिलेला धनादेश न वटल्याच्या फौजदारी खटल्यात आरोपी मुकेश इश्वर बग्गन (रा. सौरभनगर, भिंगार, अ.नगर) यांचेवर निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्टच्या कलम १३८ अन्वयेचा आरोप सिध्द झाल्यामुळे अ.नगर येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी श्रीमती अश्विनी पाटील यांनी आरोपीस दोषी धरुन ३ महिन्यांची कैद व रक्कम रुपये १ लाख नुकसान भरपाईपोटी फिर्यादीस देण्याचा आदेश केला, शिवाय सदरची रक्कम ३० दिवसात न दिल्यास आणखी १ महिना कैदेची शिक्षा सुनावण्यात आली.

सदर खटल्याची थोडक्यात हकीकत अशी की, भिंगार येथील पद्माकर रमेश हरबा (रा. पाटील गल्ली, भिंगार, अ.नगर) यांचेकडून आरोपी मुकेश इश्वर बग्गन यांनी सन २०१३ साली रक्कम रुपये ५०००० (पन्नास हजार) ऊसनवार म्हणून घेतलेली होती, त्या बदल्यात नोटरी पब्लिक यांचेसमोर तशी उसनवार पावती देखील लिहून दिलेली होती, सदरची रक्कम वारंवार मागणी करुनही आरोपी यांनी दिली नाही व त्या बदल्यात रोख रकमेऐवजी रु.५० हजारांचा अ. नगर जिल्हा सहकारी बँकेचा धनादेश फिर्यादीस दिलेला होता, तो न वटल्यामुळे फिर्यादी पद्माकर हरबा यांनी अ. नगर येथील न्यायालयात यातील आरोपीवर निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्टच्या कलम १३८ नुसार फौजदारी खटला दाखल केलेला होता.

सदर खटल्यात आरोपीतर्फे बचाव घेण्यात आला की, फिर्यादी हे भिंगार येथे सावकारी करतात व सदर रक्कम सावकारी व्यवहारातील असल्यामुळे ती कायदेशीर नाही परंतु न्यायालयाने हा बचाव फेटाळला, विशेष म्हणजे आरोपी हा अ.नगर येथील एका बँकेत नोकरीस आहे. या फौजदारी खटल्यात फिर्यादी यांचेतर्फे ॲड. रमेश अ. जोशी व ॲड. सौ. दीपाली झांबरे यांनी काम पाहीले, त्यांना ॲड. राजस करमरकर यांनी सहाय्य केले. आरोपीतर्फे न्यायालयात ॲड. अंजन बचाटे यांनी बाजू मांडली.

# फिरोदिया शिवाजीयन्स इंटर स्कूल फुटबॉल स्पर्धेत १६ वर्ष वयोगटात आठरे पाटील स्कूलची विजयी हॅट्रीक

### १७ वर्षा खालील मुली व १२ वर्ष वयोगटात मुलांमध्ये प्रवरा पब्लिक स्कूलला विजेतेपद; १४ वर्ष वयोगटात (मुले) तक्षिला स्कूल विजयी, ४७ संघांच्या रेकॉर्ड ब्रेक सहभागाने रंगले १०८ सामने

नगर – फिरोदिया शिवाजीयन्स इंटर स्कूल फुटबॉल स्पर्धेच्या अंतिम सामन्यांचे थरार प्रेक्षकांनी अहमदनगर महाविद्यालयाच्या मैदानावर अनुभवले. विविध गटातील अंतिम सामने रंगले होते. यामध्ये १७ वर्षा खालील मुलींच्या गटात व १२ वर्ष वयोगटात (मुले) प्रवरा पब्लिक स्कूलने विजय मिळवला. १४ वर्ष वयोगटात (मुले) तक्षिला स्कूलच्या संघाने विजेतेपद प्राप्त केले. तर १६ वर्ष वयोगटात (मुले) आठरे पाटील स्कूलने सलग तिसऱ्यांदा विजय मिळविण्याचा बहुमान पटकाविला. विजेत्या संघातील खेळाडूंनी मैदानावर एकच जल्लोष केला होता. स्पर्धेचे हे सातवे वर्ष होते. यामध्ये ४७ संघांचा रेकॉर्ड ब्रेक सहभाग लाभला होता. तर १०८ फुटबॉलचे सामने रंगले होते.



फिरोदिया शिवाजीयन्स इंटर स्कूल फुटबॉल स्पर्धेतविजयी, उपविजयी व तृतीय क्रमांक मिळवलेल्या संघास अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया व वरिष्ठ उपाध्यक्ष मनोज वाळवेकर यांच्या हस्ते चषक व खेळाडूंना मेडल देऊन सन्मानित करण्यात आले.

विजयी, उपविजयी व तृतीय क्रमांक मिळवलेल्या संघास अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया व वरिष्ठ उपाध्यक्ष मनोज वाळवेकर यांच्या हस्ते चषक व खेळाडूंना मेडल देऊन सन्मानित करण्यात आले. याचबरोबर पाहुण्यांच्या हस्ते विविध श्रेणीतील उत्कृष्ट खेळाडूंना वैयक्तिक बक्षिसं देण्यात आली. यावेळी सचिव रोनप फर्नांडिस, उपाध्यक्ष खालिद सय्यद, जोगासिंह मिनहास, खजिनदार रिशपालसिंग परमार, सहसचिव प्रदीप जाधव, विक्टर जोसेफ, सहखजिनदार रणबीरसिंह परमार, राजू पाटोळे, अहमदनगर महाविद्यालयाचे क्रीडा विभाग प्रमुख डॉ. सॅवियो वेगास, कोअर कमिटी सदस्य जेव्हिअर स्वामी, राजेश अँथनी, सचिन पठारे, पल्लवी सैंदाणे, अभिषेक सोनावणे, श्रेया सागडे आदींसह प्रशिक्षक, पंच व खेळाडू उपस्थित होते.

नरेंद्र फिरोदिया म्हणाले की, शाळेपासूनच फुटबॉल खेळाडू घडावा या उद्देशाने या स्पर्धेला प्रारंभ करण्यात आले. या स्पर्धेमुळे फुटबॉल खेळाला चालना मिळाली असून, शहरातील वातावरण फ ुटबॉलमय बनले आहे. शहरातील चित्र बदलत असून, फुटबॉलची क्रेझ वाढत चालली आहे. मुलांबरोबर मुलींचे संघ देखील मोठ्या संख्येने स्पर्धेत उतरल्याचे त्यांनी सांगितले.

मनोज वाळवेकर म्हणाले की, या स्पर्धेची भव्यता दरवर्षी वाढत चालली आहे. या वर्षीही शालेय संघांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, सर्वांच्या सहयोगाने ही स्पर्धा यशस्वी झाली. फुटबॉल खेळाला चालना देण्यासाठी नवोदित खेळाडूंना फिरोदिया शिवाजीयन्सने एक व्यासपीठ निर्माण करून दिले आहे. या प्रोत्साहनामुळे खेळाडू राज्य व राष्ट्रीय पातळीवर चमकत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

प्रारंभी मैदानात झुंम्बा डान्स, मर्दानी खेळाचे प्रात्यक्षिक रंगले होते. तसेच यावेळी चित्रकला व फेस पेंटिंग स्पर्धा पार पडली. यामधील विजेत्यांना पाहुण्यांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली. स्पर्धे दरम्यान रंगलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाचा प्रेक्षकांसह खेळाडूंनी आनंद लुटला. पाहुण्यांच्या हस्ते फिरोदिया शिवाजीयन्सच्या विविध गटातील फुटबॉल संघाच्या जर्सीचे अनावरण करण्यात आले. या स्पर्धे साठी पंच म्हणून सलमान शेख, प्रियंका आवारे, सोनिया दोसानी, प्रकाश कनोजिया, महिमा पठारे, सुर्य नैना, पूजा भिंगारदिवे, जॉय शेळके, अभय साळवे, विल्यम राज यांनी काम पाहिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व स्पर्धेचे समालोचन राहुल क्षीरसागर यांनी केले. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी फिरोदिया शिवाजीयन्सच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

फिरोदिया शिवाजियन्स इंटर–स्कूल फुटबॉल स्पर्धा २०२५ अंतिम सामन्याचा थरार.

१७ वर्षा खालील मुलींच्या गटात प्रवरा पब्लिक स्कूल विरुध्द श्री साई इंग्लिश मिडीयम स्कूल यांच्यात अंतिम सामना झाला. यामध्ये दामिनी जाधव हिने ३९ व्या मिनीटाला गोल करुन १–० गोलने प्रवरा पब्लिक स्कूलला विजेतेपद मिळवून दिले.

१२ वर्ष वयोगटात (मुले) प्रवरा पब्लिक स्कूल विरुध्द आठरे पाटील स्कूल यांच्यात झालेल्या अंतिम सामन्यात प्रवरा पब्लिक स्कूलने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करुन मागील वर्षी प्रमाणे यावर्षीही आपले विजेतेपद कायम राखले. ३–० गोलने प्रवरा पब्लिक स्कूलने विजय मिळवला. यामध्ये युवराज आहेर ५ व्या मिनीटाला गोल करुन खाते उघडले. यानंतर कुंदन बहिराम याने ९ व्या मिनीटाला व जयवर्धन मानेदेशमुख याने ४३ व्या मिनीटाला प्रत्येकी १ गोल केला.

१४ वर्ष वयोगटात (मुले) आर्मी पब्लिक स्कूल विरुध्द तक्षिला स्कूल यांच्यात झालेल्या अंतिम सामना शेवटच्या क्षणापर्यंत रंगला होता. दोन्ही तुल्यबळ संघाच्या उत्कृष्ट खेळाने हा सामना ०–० गोलने अनिर्णित राहिला होता. यानंतर टाय ब्रेकवर तक्षिला स्कूलने ३–२ गोलने विजय मिळवला. तक्षिला कडून साईराज कबाडी, चिरयू लोढा व तन्मय लोढा यांनी प्रत्येकी १ गोल केला. आर्मी स्कूलकडून सोहम हिंगे व प्रथमेश लहाडे यांनी प्रत्येकी १ गोल केला.

१६ वर्ष वयोगटात (मुले) आर्मी पब्लिक स्कूल विरुध्द आठरे पाटील स्कूल यांच्यात अंतिम सामन्यात आठरे पाटील स्कूलने ५–१ गोलने विजय मिळवून या स्पर्धेत सलग विजयाची हॅट्रीक केली. आठरे पाटील कडून भानुदास चंद याने गोलची हॅट्रीक केली. त्याने १८, ३५ व ४८ व्या मिनीटाला गोल करुन उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. यश अल्हाट (२२ मिनीट) व समर्थ तरवडे (५८ मिनीट) यांनी प्रत्येकी १ गोल केला. आर्मी पब्लिक स्कूल कडून ३१ व्या मिनीटाला अश्मित पांडे याने एकमेव गोल केला.

तिसऱ्या स्थानासाठी १४ वर्ष वयोगटात (मुले) प्रवरा पब्लिक स्कूल विरुध्द विरुध्द सेक्रेट हार्ट कॉन्व्हेंट स्कूलमध्ये झालेल्या सामन्यात प्रवरा पब्लिक स्कूलने ३–० गोलने विजय मिळवला. यामध्ये प्रवरा पब्लिक स्कूल कडून जतीन गायकवाड (१५ मिनीट), रामचंद्र पालवे (३५ मिनीट) व मोहित चौधरी (४२ मिनीट) यांनी प्रत्येकी १ गोल केला.

तसेच १६ वर्ष वयोगटात (मुले) प्रवरा पब्लिक स्कूल विरुध्द विरुध्द सेक्रेट हार्ट कॉन्व्हेंट स्कूलमध्ये तिसऱ्या स्थानासाठी झालेल्या सामन्यात २–० गोलने सेक्रेट हार्ट कॉन्व्हेंटने विजय मिळवला. आरुष पोपळघट (१२ मिनीट) व सोहम सोले (१४ मिनीट) यांनी प्रत्येकी १ गोल केला.

## व्यक्तिगत पारितोषिक विजेते

जान्हवी लंघे (पोदार इंटरनॅशनल स्कूल), वेदिका ससे (आठरे पाटील पब्लिक स्कूल), इंदिरा ब्राम्हणे (प्रवरा पब्लिक स्कूल), हृदया तडके (श्री साई इंग्लिश मीडियम स्कूल), युवराज आहेर (प्रवरा पब्लिक स्कूल), जयवर्धन मानेदेशमुख (प्रवरा पब्लिक स्कूल), वेदांत बांगर (ऑक्झिलियम कॉन्व्हेंट), अभिनव मोरे (तक्षिला स्कूल), वेदांत ससे (आठरे पाटील पब्लिक स्कूल), प्रथमेश लहाडे (आर्मी पब्लिक स्कूल), सोहम हिंगे (आर्मी पब्लिक स्कूल), भावेश गडाख (ऑर्चिड इंटरनॅशनल स्कूल), शौर्य मोरे (तक्षिला स्कूल), साईराज कबाडी (तक्षिला स्कूल), तन्मय लोढा (तक्षिला स्कूल), रामचंद्र पालवे (प्रवरा पब्लिक स्कूल), मोहित चौधरी (प्रवरा पब्लिक स्कूल), जतीन गायकवाड (प्रवरा पब्लिक स्कूल), हर्षद सोनवणे (सेक्रेड हार्ट कॉन्व्हेंट), ओम लोखंडे (आठरे पाटील पब्लिक स्कूल), भानुदास चंद (आठरे पाटील पब्लिक स्कूल), अथर्व गिर्जे (आठरे पाटील पब्लिक स्कूल), आदर्श साबळे (आर्मी पब्लिक स्कूल), लक्ष्य चौहान (आर्मी पब्लिक स्कूल), अंशुमन विधाते (सेक्रेड हार्ट कॉन्व्हेंट), सौरभ खंडेलवाल (सेक्रेड हार्ट कॉन्व्हेंट), स्वराज जाधव (ऑक्झिलियम कॉन्व्हेंट), पवनराजे वाणी (प्रवरा पब्लिक स्कूल).

